नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक २०१ * ❊ अकोला ❊ शुक्रवार, दिनांक २३ जानेवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## स्टील कारखान्यात स्फोट, सहा कामगार ठार

■ **वृत्तसंस्था, भाटापारा, दि. २२ :** छत्तीसगडमधील भाटापारा परिसरात आज सकाळी एका स्टील कारखान्यात भीषण दुर्घटना घडली. बालोदाबाजार- भाटापारा जिल्ह्यातील या उद्योगात अचानक मोठा स्फोट झाला.

स्फोटात कारखान्याच्या काही भागांचे मोठे नुकसान झाले. या अपघातात किमान सहा कामगारांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे, तर दहा पेक्षा अधिक कामगार गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून काहींची प्रकृती चिंताजनक आहे. पोलीस, अग्निशमन दल आणि बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या कामगारांना बाहेर काढणे सुरू होते.

# बेताल ट्रम्पचे चाळे

आग्राग्र लेख **खरीखरी..** श्रीकृष्ण चांडक



अमेरिकेच्या इतिहासात ट्रम्पसारखा अध्यक्ष कधी झालाच नसेल. या देशातील कितीतरी भल्याभल्या प्रतिभावंत अध्यक्षांनी आपल्या अतिशय उच्च पातळीची गुणवत्ता आणि बुद्धिमत्ता सिद्ध केली होती. पण गेल्या एक दीड वर्षांमध्ये या ट्रम्प महाशयांनी जे जे उपक्रम केले किंवा जे जे चाळे केले त्याला जगाच्या इतिहासात अजिबात तोड नाही. आम्ही म्हणू ती पूर्व दिशा, आम्ही ठरवू तो खरा निर्णय, आमच्याविरुद्ध जो जो जाईल त्याला आम्हीच अद्दल घडवू, हाच या ट्रम्पाचा नियम आहे. या माणसाला जे जे वाटते ते खरे करायचे आहे आणि सर्व देश अमेरिकेच्या छत्रछायेखाली आणायचे आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर सोवियत संघाला जे महत्त्व आले होते ते महत्त्व पुढील ३०-४० वर्षात पार नष्ट झाले. त्यानंतर सोवियत संघाची अक्षरशः शकले झाली. त्यामुळे १६ नवे देश अस्तित्वात आले आणि रशिया एकटाच उरला. नेमक्या याच गोष्टीमुळे सोवियत संघाचा जो दबदबा होता तो आपोआप संपला आणि आता आपल्या जुन्या भावंडांना आक्रमकपणे आपल्यात सामावून घेण्यासाठी रशियाचा अजूनही सुरू असलेला आटापिटा जगाला दिसतो आहे. डोनाल्ड ट्रम्प यापासून काही धडा घेतील हे शक्यच नाही त्यामुळे या ट्रंपाने आपल्या नकाशात तीन देशांना समाविष्ट करून टाकलेले आहे. त्यामध्ये कॅनडा आहे आणि जगातील बफार्चा गोळाही आहे. फिडेल कॅस्ट्रोच्या काळात क्युबाला अमेरिका जिंकू शकली नाही, पण आता या क्युबावरही ट्रम्पाची नजर आहे. म्हणजेच आता जिथे नजर जाईल आणि ज्यावर ट्रम्प हात ठेवील तो देश ट्रम्पाचा आहे हे त्याचे साधे गणित आहे. एखाद्या सराईत गुंडाने आपल्या आजूबाजूच्या एखाद्या घराला हे माझे घर आहे असे म्हटल्यानंतर ते घर त्या मालकाला सोडावेच लागते असा आजवरचा इतिहास आहे. दाऊदचे गुंड राजरोसपणे हे काम अगदी दादागिरीने करीत असत. अगदी तशीच दादागिरी दाखविणे हीच सध्याच्या ट्रम्पाची निशाणी झालेली आहे. जे जे देश ट्रम्पचे ऐकणार नाहीत त्यांच्यावर भयानक टेरिफ लावण्याचा नवा धंदा ट्रम्पने शोधून काढलेला दिसतो. आपला भारत देश तर त्याच्या अगदी निशाण्यावर आहे. भारताने अमेरिकेचा शेतमाल विकत घ्यावा, हा ट्रम्पाग्रह आपण स्वीकारू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे ट्रम्प महाशयांनी भारताचे पंतप्रधान मोदी साहेब आपले परममित्र आहेत असे बेंबीच्या देठापासून ओरडून सांगितले तरी ते खोटे आहे असे आपण समजावे. अजूनही या ट्रम्पची अध्यक्षपदाची कारकीर्द दोन वर्षे १० महिने बाकी आहे. या कालखंडात जागतिक राजकारणाचा पुरता सत्यानाश हा माणूस करून टाकणार आहे हे अगदी सुस्पष्ट आहे. युरोपातील देश अमेरिकेचे खास मित्र आहेत किंवा होते असे म्हणावे लागेल. तेव्हा आता या मित्रांबरोबरची मैत्रीही या माणसाने पणाला लावलेली आहे. जगाला काही देण्याऐवजी जगाला ओरबाडणारा अमेरिकेचा अध्यक्ष म्हणून या ट्रम्पचे नाव काळ्याकुट्ट अक्षरात कोरले जाईल, यात अजिबात शंका नाही.


mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023


## आणीबाणीतील बंदीजनांचा होणार सन्मान

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :** राष्ट्रीय आणीबाणीला विरोध करताना तुरुंगवास भोगलेल्या बंदीजनांना आता प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन आणि स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात येणाऱ्या शासकीय समारंभात निमंत्रित म्हणून सहभागी होण्याचा मान मिळणार आहे. सामान्य प्रशासन विभागाने याबाबतचे शासन परिपत्रक जारी केले.

प्रजासत्ताक दिन -२६ जानेवारी, महाराष्ट्र दिन -१ मे आणि स्वातंत्र्यदिन- १५ ऑगस्ट या कार्यक्रमात आता ज्यांना कारावास भोगावा लागला अशा व्यक्तींचा सन्मान म्हणून त्यांना सन्मानपूर्वक निमंत्रित करावे, असे परिपत्रकात म्हटले आहे.

## महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांमधील

# महापौर आरक्षण जाहीर

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २२ :** राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीची रणधुमाळी संपल्यानंतर आता सर्वांचे लक्ष प्रतिष्ठेच्या महापौरपदाकडे लागले आहे. या महापालिकांच्या महापौरपदासाठी आज आरक्षणाची सोडत जाहीर करण्यात आली.

नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या




उपस्थितीत दुपारी १२ वाजता ही प्रक्रिया पार पडली. मुंबई महानगरपालिकेचा महापौर हा खुल्या प्रवर्गातील असेल. कल्याण-डोंबिवलीत अनु. जमाती प्रवर्गाचा महापौर असेल. तर ठाणे अनु. जाती, जालना अनु. जाती महिला आणि लातूर अनु. जाती महिलासाठी राखीव असेल. मात्र, परभणी महापालिकेतील महिला आरक्षणावर आक्षेप घेण्यात आला आहे.

| महापालिका | आरक्षण |
|---|---|
| 1) बृहन्मुंबई (BMC) - | सर्वसाधारण, महिला |
| 2) ठाणे - | अनुसूचित जाती |
| 3) कल्याण-डोंबिवली - | अनुसूचित जमाती |
| 4) नवी मुंबई - | सर्वसाधारण, महिला |
| 5) वसई-विरार - | सर्वसाधारण |
| 6) भिवंडी-निजामपूर - | सर्वसाधारण |
| 7) मीरा-भाईंदर - | सर्वसाधारण, महिला |
| 8) उल्हासनगर - | ओबीसी |
| 9) पुणे - | सर्वसाधारण, महिला |
| 10) पिंपरी-चिंचवड - | सर्वसाधारण |
| 11) नागपूर - | सर्वसाधारण, महिला |
| 12) अहिल्यानगर - | ओबीसी, महिला |
| 13) नाशिक - | सर्वसाधारण, महिला |
| 14) संभाजीनगर - | सर्वसाधारण, |
| 15) अकोला - | ओबीसी, महिला |
| 16) अमरावती - | सर्वसाधारण |
| 17) लातूर - | अनुसूचित जाती, महिला |
| 18) नांदेड - | सर्वसाधारण, महिला |
| 19) चंद्रपूर - | ओबीसी, महिला |
| 20) धुळे - | सर्वसाधारण, महिला |
| 21) जळगाव - | ओबीसी, महिला |
| 22) मालेगाव - | सर्वसाधारण, महिला |
| 23) कोल्हापूर - | ओबीसी |
| 24) सांगली-मिरज - | सर्वसाधारण |
| 25) सोलापूर - | सर्वसाधारण |
| 26) इचलकरंजी - | ओबीसी |
| 27) जालना - | अनुसूचित जाती, महिला |
| 28) पनवेल - | ओबीसी |
| 29) परभणी - | सर्वसाधारण |

## मुंबईची पुढची महिला महापौर कोण?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :** राज्यातील २९ महानगरपालिकांच्या महापौरपदासाठी आरक्षण सोडत जाहीर झाल्यानंतर मुंबईच्या महापौरपदाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मुंबई महानगरपालिका ही देशातील सर्वात श्रीमंत आणि प्रभावशाली महापालिका मानली जाते.

आज जाहीर झालेल्या सोडतीनुसार मुंबईचे महापौरपद हे खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव करण्यात आले आहे. त्यामुळे आता मुंबईच्या पुढील महिला महापौर कोण असणार, यावर चर्चा सुरू झाली आहे.

मुंबई महापालिकेत सध्या शिवसेना-भाजप-रिपब्लिकन पक्ष अशी महायुती सत्तेत आहे. या महायुतीकडे एकूण ११८ नगरसेवक असून बहुमताचा आकडा ११४ आहे. त्यामुळे मुंबईचे महापौरपद महायुतीलाच मिळणार, हे निश्चित आहे. महापौरपद महिलांसाठी राखीव असल्यामुळे महिला नगरसेविकांमधूनच महापौर निवड होणार आहे.

भाजपकडून महापौरपदासाठी ज्या महिला नगरसेविकांची नावे चर्चेत आहेत, त्यामध्ये राजश्री शिरवडकर, अलका केरकर, हर्षिता नार्वेकर, रितू तावडे, आशा मराठे आणि शितल गंभीर यांचा समावेश आहे. मालाडमधून मताधिक्क्याने विजयी झालेल्या योगिता सुनील कोळी यांचे नावही चर्चेत आहे. त्यांच्या विजयाला जनतेचा मोठा पाठिंबा मिळाल्याने पक्षातील वरिष्ठ नेत्यांचे लक्ष त्यांच्याकडे गेले आहे.

## दरीत कोसळली सैन्याची गाडी

# १० जवानांचा मृत्यू

■ **वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. २२ :** जम्मू-काश्मीरमधील डोडा जिल्ह्यात गुरुवारी लष्कराचे एक वाहन २०० फूट खोल दरीत कोसळले. या अपघातात १० जवान शहीद झाले आहेत. वाहनात २१ जवान होते. त्यापैकी ११ जवान जखमी झाले आहेत. जखमी जवानांना उधमपूर मिलिटरी हॉस्पिटलमध्ये एअरलिफ्ट करण्यात आले आहे.

हा अपघात भद्रवाह-चंबा आंतरराज्यीय रस्त्यावरील खन्नी टॉप येथे झाला. सर्व जवान एका वरच्या भागात असलेल्या चौकीकडे जात असताना चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि वाहन थेट दरीत कोसळले.

## १६ नक्षल्यांना कंठस्नान

■ **वृत्तसंस्था, सिंहभूम / झारखंड, दि. २२ :** पश्चिम सिंहभूम जिल्ह्यातील सारंडा जंगलात गुरुवारी सकाळपासून सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये भयंकर चकमक सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार, या कारवाईत अंदाजे १६ माओवादी ठार झाले असून, त्यात १ कोटी रुपयांचे बक्षीस असलेला वरिष्ठ माओवादी कमांडर अनल उर्फ तुफान यांचा समावेश आहे.

अनल हा सीपीआय (माओवादी) चा केंद्रीय समिती सदस्य असून, बर्याच काळापासून सुरक्षा दलांच्या मोस्ट वॉन्टेड यादीत होता. सुरक्षा दलांना माहिती मिळाली होती की नक्षलवादी या भागात मोठी घटना घडवण्याचा कट रचत आहेत, त्यानंतर त्यांनी कुंभाडीह गावाजवळील परिसरात घेराबंदी आणि शोध मोहीम राबवली.

गुरुवारी सकाळपासून संपूर्ण परिसरात अधूनमधून गोळीबार सुरू असून, सुरक्षा दलांनी जंगलातील प्रत्येक मार्गावरील पळून जाण्याचे मार्ग रोखण्यासाठी अतिरिक्त पथके तैनात केले आहेत. परिसरातील कठीण भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन खबरदारी घेतली जात आहे.

कोल्हाण विभागाचे डीआयजी अनुरंजन किस्पोट्टा यांनी सांगितले की ऑपरेशन सुरू असून, चकमकीनंतर सविस्तर माहिती दिली जाईल. सारंडा जंगल आणि आजूबाजूच्या भागात हाय अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. सुरक्षा दल आणि प्रशासन यांनी या कारवाईतून नक्षलवाद्यांच्या पोकळ्या हालचालींवर लक्ष ठेवले असून, शांतता राखण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलली जात आहेत.

## दावोसमध्ये महाराष्ट्राचा डंका! ३० लाख कोटींचे सामंजस्य करार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सध्या दावोसच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी इथून महाराष्ट्रात किती गुंतवणूक आली आहे तसेच राज्याच्या कोणत्या भागात व कोणत्या क्षेत्रात गुंतवणूक आली आहे, यांची माहिती देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत दिली.



फडणवीस म्हणाले, दावोस दौरा यह अतिशय यशस्वी झाला आहे. मला सांगताना आनंद वाटतो की जवळपास गुंतवणुकीचे करार जे केले आहेत ते ३० लाख कोटी रुपयांचे आहेत. अजून ७-१० लाख कोटी पुढच्या काळात होणार आहे. ही जी काही गुंतवणूक आहे, यात इंडस्ट्री सेक्टर आहे, सर्व्हिस सेक्टर आहे, कृषी क्षेत्र आहे, सगळ्याच क्षेत्रात गुंतवणूक आपल्याकडे येत आहे.

यातील ८३ टक्के जे काही करार आहेत, यात एफडीआय आहे. १६ टक्के गुंतवणूक अशी आहे ज्यात फायनॅनष्यल इंस्टीट्यूट किंवा टेक्निकल आहेत, या गुंतवणुकी एफडीआय कमी आहे, पण फॉरेन टेक्नॉलॉजी आहेत.

पुढे बोलताना फडणवीस म्हणाले, एकूण किती देशातून गुंतवणूक आपल्याकडे येत आहे, याचा हिशोब लावला तर एकूण १८ देशातून ही गुंतवणूक आपल्याकडे येत आहे. यात अमेरिका, यूके, स्वित्झर्लंड, स्वीडन, सिंगापुर, नेदरलँड, जपान, इटली, यूएई, डेन्मार्क, नॉर्वे, फिनलंड, स्पेन, कॅनडा, बेल्जियम, ऑस्ट्रीया, अशा अनेक देशांतून गुंतवणूक येत आहे.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, महाराष्ट्राचे परफॉर्मंस सगळ्यात चांगला राहिला आहे. एक प्रकारे या कागदावरच्या घोषणा नाहीत. अनेकवेळा लोकांचा गैरसमज होत असतो, या गुंतवणुकीचा कालावधी जो असतो, हा ३ वर्षांपासून ते ७ वर्षांपर्यंत असते.

अनेक मोठ्या कंपन्या आपल्याकडे गुंतवणूक करण्यास तयार झाले आहेत. यासोबत कुठल्या क्षेत्रात गुंतवणूक येत आहे ते देखील महत्त्वाचे आहे. यात क्वांटम कम्प्यूटिंग, एआय डेटा सेंटर, एआय टेक्नॉलजी, इलेक्ट्रॉनिक्स, फॅब सेमीकंडक्टर्स, जीसीसी, आपल्याकडे नवीन वेव ही जीसीसीची आहे. तसेच फूड प्रोसेसिंग, रिनिवेबल एनर्जि, ग्रीन स्टील, ईव्ही, अर्बन ट्रांस्फॉर्मेशन, शिप बिल्डिंग, एड्युकेशन, फीनटेक, मॅजिस्टिक आणि टेक्सटाइल तसेच डिजिटलमध्ये गुंतवणूक आली आहे.

आता गुंतवणूक आली कुठे? तर महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागात ही गुंतवणूक आली आहे. कोकणचे क्षेत्र असेल किंवा एमएमआरचे क्षेत्र आहे, विदर्भात १३ टक्के गुंतवणूक आली आहे, ५० टक्के गुंतवणूक महाराष्ट्राच्या इतर भागांमध्ये आली आहे. यावेळी उत्तर महाराष्ट्रात नाशिक, जळगाव, अहिल्यानगर, नंदुरबार आणि धुळे या सगळ्या भागांमध्ये गुंतवणूक आली आहे.

मराठवाड्याचे जे नवीन मॅगनेट तयार झाले आहे, ते आहे छत्रपती संभाजीनगर, याही ठिकाणी जवळपास ५५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आलेली आहे. नागपूर विभाग तसेच विदर्भ जो आहे, त्या ठिकाणी जवळपास २ लाख ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आलेली आहे. याचसोबत पुणे, सिंधुदुर्ग आणि रायगडमध्ये देखील चांगली गुंतवणूक आली असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली.

## पोक्सोच्या आरोपीची कोठडीत आत्महत्या

### जरीपटका पोलीस ठाण्यात खळबळ : तपास सीआयडीकडे

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २२ :** अल्पवयीन प्रेयसीला पळवून नेत तिच्याशी लैंगिक संबंध प्रस्थापित केले . यावरून उत्तर प्रदेशातील एका तरुणाविरुद्ध पोक्सोसह लैंगिक अत्याचाराचा गुन्हा नोंदवून अटक करण्यात आली. यामुळे तणावात असलेल्या तरुणाने पोलीस ठाण्याच्या कोठडीत चादरीने गळफास लावून आत्महत्या केली.



ही घटना गुरुवारी पहाटे उघडकीस आली. नागेंद्रकुमार रामजी भाटिया (१९) असे आरोपीचे नाव आहे.

नागेंद्रकुमार हा उत्तर प्रदेशच्या प्रयागराज जिल्ह्यातील हंडीया गावचा रहिवासी होता. त्याचे इंस्टाग्रामवरुन जरीपटक्यात राहणाऱ्या १६ वर्षीय मुलीशी प्रेमसंबंध होते. दोघांमध्ये दररोज बोलचाल आणि चॅटिंग होऊ लागली. त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला.

त्यासाठी तो गेल्या महिन्यात दोन वेळा नागपुरात येऊन मुलीला भेटून गेला. त्यानंतर दोघांनीही पळून जात लग्न करण्याचा निर्णय घेतला. आठवडाभरापूर्वीच नागेंद्र हा नागपुरात आला आणि मुलीला पळवून प्रयागराजला नेले.

इकडे मुलीच्या आईवडिलांनी जरिपटका पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. मुलगी नागेंद्रसोबत प्रयागराजला असल्याची माहिती मिळाली. जरिपटका पोलिसांनी नागेंद्रला प्रयागराज पोलिसांच्या मदतीने उत्तर प्रदेशातून अटक केली. बुधवारी त्याला न्यायालयाने दोन दिवसांच्या पोलिस कोठडीत पाठवले.

जरिपटका पोलीस आरोपीची चौकशी करत होते. पहाटेच्या सुमारास नागेंद्रने कोठडीत गळफास लावून आत्महत्या केली. सकाळी ठाण्यातील कर्मचाऱ्यांना नागेंद्र हा गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आला.

### पोलिसांचा हलगर्जीपणा

लैंगिक अत्याचार आणि पोक्सोच्या गुन्ह्यात अटक झाल्याने नागेंद्र अस्वस्थ होता. संपूर्ण रात्र त्याने विचारात काढली. पहाटे ५ वाजताच्या तो उठला. अंगावर ओढायला दिलेली चादर फाडली. त्यानंतर शौचालयातून त्याने डबा आणला. त्या डब्यावर चढून त्याने कोठडीच्या गजाला चादर बांधली आणि गळफास घेतला. आत्महत्या करण्यापूर्वी तो जवळपास १० मिनिटे इकडून-तिकडे फिरत निर्णय पक्का करीत होता. या दरम्यान एकही पोलिस कर्मचारी कोठडीकडे फिरकला नाही. खरे तर कोठडीत असलेल्या आरोपीच्या हालचालींवर गार्ड ड्युटी करणाऱ्या कर्मचाऱ्याचे लक्ष असायला हवे होते.

### सीआयडीने सुरू केला तपास

आरोपीने कोठडीत गळास घेतल्यामुळे हे प्रकरण कस्टोडिअल डेथचे आहे. त्यामुळे याचा तपास सीआयडीकडे सोपविण्यात आला आहे. सकाळीच सीआयडीचे पथक जरीपटका पोलिस ठाण्यात दाखल झाले. त्यांनी तपास सुरू केला असून सीसीटीव्ही फुटेज, तपास डायरी, स्टेशन डायरीवरील नोंदी ताब्यात घेतल्याची माहिती आहे. या प्रकरणात ठाणेदार अनिल ताकसांडेसह गार्ड ड्युटी कर्मचारी राहुल, तपास अधिकारी आणि नाईट ड्युटी ऑफीसर यांच्यावर निलंबनाची कारवाई होण्याची शक्यता आहे.

# मुख्यमंत्री असहाय्य आहेत का?

### महाड प्रकरणी हायकोर्टाचा संताप

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २२ :** महाड नगरपरिषदेच्या निवडणुकीदरम्यान झालेल्या राड्याप्रकरणी मुख्य आरोपींना अटक करण्यात आलेल्या अपयशावर मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

या प्रकरणात मंत्री भरत गोगावले यांचा मुलगा विकास गोगावले याच्यासह इतर आरोपी अजूनही मोकाट असल्याने न्यायालयाने सरकारच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

मुख्यमंत्री इतके असहाय्य झाले आहेत की या प्रकरणात त्यांना काहीही करता येत नाही, अशा कठोर शब्दांत उच्च न्यायालयाने निरीक्षण नोंदवत, मुख्यमंत्री आणि मंत्री भरत गोगावले यांच्याकडून थेट निर्देश घ्या, अशा सूचना सरकारला दिल्या आहेत. या निरीक्षणामुळे राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेवर पुन्हा एकदा गंभीर चर्चा सुरू झाली आहे.

या प्रकरणात विकास गोगावले याच्यासह त्यांचा पुतण्या महेश गोगावले, माजी आमदार माणिक जगताप यांचा मुलगा तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते श्रीयांश जगताप यांच्यावरही गुन्हे दाखल आहेत. न्यायालयाने या सर्व आरोपींबाबत सरकारची भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले आहेत.

अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यानंतरही आरोपींना अटक होत नसल्यामुळे पोलिस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. सरकार गंभीर आहे की केवळ वेळकाढूपणा करत आहे, असा थेट सवाल न्यायालयाने उपस्थित केला आहे. परिणामी, सरकारची डोकेदुखी वाढली आहे.

## आजही तळपणार अभिषेकची बॅट?

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :** भारताच्या दौऱ्यावर आलेल्या न्युझीलंड संघासोबत सुरू झालेल्या टी-२० मालिकेतील दुसरा टी-२० सामना २३ जानेवारी रोजी रायपूरमध्ये खेळला जाईल. या सामन्यातही भारतीय फलंदाज अभिषेक शर्माची बॅट नागपूरप्रमाणे तळपेल, असा विश्वास क्रिकेटप्रेमींना आहे.

भारताने पहिल्या टी-२० सामन्यात न्यूझीलंडचा ४८ धावांनी पराभव करून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. बुधवारी नागपूरमध्ये प्रथम फलंदाजी करताना भारताने २३८ धावा केल्या. प्रत्युत्तरात, किवी संघाला फक्त १९० धावा करता आल्या. अभिषेक शर्माने ८४ धावा केल्या. वरुण चक्रवर्ती व शिवम दुबे यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

भारताकडून रिंकू सिंगने ४४, कर्णधार सूर्यकुमार यादवने ३२ आणि हार्दिक पंड्या यांनी २५ धावा केल्या. अर्शदीप सिंग, हार्दिक पंड्या आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. न्यूझीलंडकडून जेकब डफी आणि काइल जेमीसन यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. मार्क चॅपमनने फलंदाजी करताना संघाकडून ३९ धावा केल्या.



### टी-२० वर्ल्डकपमधून बांगलादेश अखेर बाहेर

बांगलादेशने भारतात टी-२० विश्वचषक खेळण्यास नकार दिला आहे. गुरुवारी राष्ट्रीय संघाच्या खेळाडूंशी झालेल्या बैठकीनंतर, बांगलादेशचे क्रीडा सल्लागार आसिफ नजरुल यांनी सांगितले की त्यांना विश्वचषक खेळायचा आहे, परंतु भारतातील त्यांच्या खेळाडू आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबद्दल चिंता कायम आहेत. बांगला देश आणि भारतात काही कारणांवरून तणाव आहे.

# राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांचे विलीनीकरण होणार का?



## सुनील तटकरे म्हणतात... आम्ही उत्सुक नाही!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाविषयी एक सूचक विधान केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस या प्रकरणी उत्सुक नाही, पण तशी एखादी परिस्थिती उद्भवली तर योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस सत्ताधारी एनडीए सोबत असल्याची बाबही आवर्जून निदर्शनास आणून दिली.

राज्यातील महापालिका निवडणुकीत शरद पवार व अजित पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांची अत्यंत सुमार कामगिरी झाली. अनेक ठिकाणी या पक्षांना मानहाणीकारक पराभव पत्करावा लागला. यामुळे या दोन्ही पक्षांच्या विलीनीकरणाच्या चर्चेने चांगलाच जोर धरला आहे. या पार्श्वभूमीवर सुनील तटकरे यांनी विधान केले आहे.

ते म्हणाले, मी याविषयी फार काही बोलू शकत नाही. कारण, विलीनीकरण हे अनेक गोष्टींवर अवलंबून आहे. आम्ही भाजपप्रणित एनडीएचा भाग आहोत हे या प्रकरणी प्रामुख्याने लक्षात घ्यावे लागेल. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) विलीनीकरणासाठी उत्सुक नाही. पण तशी एखादी परिस्थिती उद्भवली, तर योग्य तो निर्णय घेतला जाईल. पण आम्ही महाराष्ट्रात महायुतीत व राष्ट्रीय पातळीवर एनडीएचे भाग आहोत व पुढेही राहू हे मी या प्रकरणी स्पष्ट करतो. जिथे शक्य असेल तिथे दोन्ही पक्ष एकत्र निवडणूक लढतील. पण जिथे आघाडी शक्य नसेल, तिथे दोन्ही पक्ष वेगवेगळे लढतील. महापालिका निवडणुकीत आम्ही जे सूत्र वापरले, तेच सूत्र इथून पुढेही वापरले जाईल.

अजित पवारांनी यासंबंधीची भूमिका यापूर्वीच स्पष्ट केली आहे. पण आम्ही एकत्र निवडणूक लढवली, तर आम्हाला एकाच चिन्हावर लढावे लागेल. एकत्र लढल्यास तुतारी किंवा घड्याळ या दोन्हीपैकी एका चिन्हावर निवडणूक लढवावी लागू शकते, असे तटकरे म्हणाले.

राष्ट्रवादीच्या शरद व अजित पवार गटाने पुणे व पिंपरी चिंचवड महापालिकेत युती केली होती. पण त्यानंतरही त्यांना पराभवाचा धक्का सहन करावा लागला. यावर भाष्य करतान, आम्ही अजूनही निकालाचे विश्लेषण करत आहोत. कुठे चूक झाले हे कळल्यानंतर आम्ही योग्य तो निर्णय घेऊ, असेही ते म्हणाले.

## मुंबईत सरकारने एसटी प्रवर्गाला डावलले



■ **मुंबई :** राज्यातील 29 महानगरपालिकांच्या महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत आज मंत्रालयात पार पडली. या सोडतीनंतर अनेक महापालिकांमधील आरक्षण स्पष्ट झालं असलं, तरी मुंबई महापालिकेच्या महापौरपदाच्या आरक्षणावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. या संपूर्ण प्रक्रियेवर शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या आणि माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. मुंबईच्या आरक्षण सोडतीत पारदर्शकता नसल्याचा गंभीर आरोप करत त्यांनी राज्य सरकार आणि सत्ताधाऱ्यांवर थेट निशाणा साधला आहे. ही सोडत ठरावीक राजकीय हितसंबंध लक्षात घेऊन काढण्यात आल्याचा संशयही त्यांनी व्यक्त केला आहे.

किशोरी पेडणेकर यांनी सर्वात मोठा मुद्दा अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गाबाबत उपस्थित केला आहे. मुंबई महापालिकेत रळ प्रवर्गातुन दोन नगरसेवक निवडून आले असताना, महापौरपदाच्या आरक्षणासाठी चिठ्ठी काढताना हा प्रवर्ग वगळण्यात का आला, असा थेट सवाल त्यांनी केला. जर रळ प्रवर्गाचे नगरसेवक महापालिकेत आहेत, तर मग त्या प्रवर्गासाठी आरक्षण का ठेवण्यात आलं नाही? असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी या निर्णयामागे राजकीय हेतू असल्याचा आरोप केला. महायुतीकडे ST प्रवर्गातील नगरसेवक नसल्यामुळेच हा प्रवर्ग जाणीवपूर्वक बाजूला ठेवण्यात आला का, असा संशयही त्यांनी व्यक्त केला. पेडणेकर यांनी पुढे आरोप केला की, आदिवासी प्रवगार्ला डावलण्यासाठी अचानक नियम बदलण्यात आले.

# आक्षेप घेणाऱ्यांना नियमांचा अभ्यास नाही

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**

राज्यातील 29 महानगरपालिकांमधील महापौरपदासाठी आज आरक्षण जाहीर करण्यात आले असून, या निर्णयामुळे महाराष्ट्राच्या स्थानिक राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत मंत्रालयात आरक्षण सोडत पार पडली. या सोडतीत मुंबई आणि पुणे या दोन प्रमुख महानगरपालिकांसह छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई, नागपूर आणि नांदेड-वाघाळा या महापालिकांचे महापौरपद खुल्या वगार्तील महिलांसाठी आरक्षित झाल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेषतः मुंबई महानगरपालिकेच्या महापौरपदासाठी सर्वसाधारण महिला उमेदवारासाठी आरक्षण जाहीर झाल्याने, देशातील सर्वात मोठ्या महापालिकेवर आता महिला नेतृत्व असणार, हे जवळपास निश्चित झाले आहे.

मुंबई महापालिकेच्या आरक्षणाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. कारण मुंबई महापालिका ही आर्थिकदृष्ट्या देशातील सर्वात श्रीमंत महापालिका मानली जाते, तसेच महापौरपदाला राजकीय आणि प्रशासकीय दृष्टिकोनातून मोठे महत्त्व आहे. आरक्षण जाहीर होताच, मुंबईतील नगरसेवकांच्या संख्याबळाचा विचार करता, महापौरपद महायुतीमधील भाजपकडे जाण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे मुंबईत महिला महापौर तर असणारच, पण त्या भाजपकडून असण्याची शक्यता अधिक असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

आरक्षण जाहीर झाल्यानंतर भाजप नेते अमित साटम



### ठाकरे गटावर भाजपचा पलटवार

यांनी या निर्णयावर प्रतिक्रिया देताना महिला नेतृत्वाचा ठामपणे पुरस्कार केला. ते म्हणाले की, मुंबई शहराला योग्य दिशा देण्यासाठी, भ्रष्टाचारमुक्त प्रशासन देण्यासाठी आणि शहराची सुरक्षितता अबाधित ठेवण्यासाठी महिला नेतृत्व पुढे येत आहे, याचा भाजपला अभिमान आहे. मुंबईची तुंबई होऊ देणार नाही. विकास सुरू असतानाच मातृशक्ती अधिक सक्षमपणे पुढे येईल, असे म्हणत त्यांनी महिला महापौराच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित केले. येत्या दोन ते तीन दिवसांत भाजप आणि शिवसेनेच्या गटांच्या स्वतंत्र बैठकाही होतील, त्यानंतर सभागृह नेता निवडीची प्रक्रिया पूर्ण केली जाईल आणि त्याच दिवशी अधिकृत नोंदणी करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महापौरपदासाठी नेमकी कोणत्या महिला नगरसेविकेचे नाव पुढे येईल, याबाबत विचारले असता अमित साटम यांनी सध्या उत्सुकता कायम ठेवण्याचे संकेत दिले. सगळे पत्ते आत्ताच उघडले तर उत्कंठा राहणार नाही, असे सूचक विधान करत त्यांनी निर्णय योग्य वेळी जाहीर केला जाईल, असे सांगितले. त्यामुळे भाजपकडून कोणत्या महिला नगरसेविकेला महापौरपदाची संधी दिली जाणार, याबाबत चर्चा सुरू झाली असून, पुढील काही दिवसांत या नावावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, मुंबई महापौरपदाच्या आरक्षणावरून ठाकरे गटाच्या नेत्यांनी आक्षेप नोंदवला होता. या आक्षेपांवर उत्तर देताना अमित साटम यांनी ठाकरे गटावर थेट टीका केली. आक्षेप घेणाऱ्यांचा नियमांचा अभ्यास नाही. त्यांनी संपूर्ण प्रक्रिया समजून घेतलेली नाही, असा आरोप त्यांनी केला. त्यांनी स्पष्ट केले की, नियम क्रमांक 3 (1) नुसार, एखाद्या महापालिकेत किमान तीन अनुसूचित जमाती प्रवर्गातील नगरसेवक असतील, तरच त्या प्रवगार्साठी महापौरपदाचे आरक्षण लागू करता येते. मात्र मुंबईत केवळ दोन रळ नगरसेवक असल्याने, महापौरपदासाठी आरक्षण लागू होऊ शकत नाही, हे नियमांमध्ये स्पष्ट आहे.

साटम यांनी पुढे सांगितले की, मुंबईला यापूर्वी अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळाले होते, त्यामुळे या वेळी ते आरक्षण वगळण्यात आले आहे. तसेच, ओबीसी आरक्षणाबाबत मुंबईचा क्रमांक पुढे आहे आणि कदाचित पुढील वेळी मुंबईला ओबीसी प्रवर्गासाठी महापौरपदाचे आरक्षण मिळू शकते.

# प्रेमसंबंधातून तरुणावर धारदार शस्त्राने वार

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २२**

पुण्यातील मुंढवा भागात प्रेमसंबंधातून एका तरुणावर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला. या प्रकरणी टोळक्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

प्रवीण धनंजय माने (वय 24, रा. श्रीमाननगर, शेवाळवाडी, पुणे-सोलापूर रस्ता) असे गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. महेश सरोदे (वय 35, रा. भीमनगर, मुंढवा) याच्यासह चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माने याने मुंढवा पोलिसठाण्यात आरोपींविरोधात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार प्रवीण माने खाजगी कंपनीत नोकरी करत असून त्याचे एका तरुणीशी प्रेमसंबंध आहेत. आरोपी सरोदे याने माने याला त्या तरुणीशी असलेले संबंध तोडण्यास सांगितले होते. मात्र, माने याने हे संबंध तोडले नाहीत. आरोपींनी दिलेल्या धमक्यांना देखील त्यानी जुमानले नाही. याच कारणावरून आरोपी सरोदे याने माने याला मुंढवा येथे बोलावून घेतले. सरोदे आणि त्याच्या साथीदारांनी माने याला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. त्यानंतर त्याच्यावर धारदार शस्त्राने वार करण्यात आले.

पोलिसांकडे तक्रार दिल्यास जिवे मारण्याची धमकी देऊन आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी भेट दिली.जखमी माने याला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांनी पसार झालेल्या सरोदे याला अटक केली असून, त्याच्यासोबत असलेल्या इतर साथीदारांचा शोध सुरू आहे. वरिष्ठ पोलिसनिरीक्षक स्मिता वासनिक यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक एस. पिंगुवाले या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## केडीएमसीतील राजकारणामुळे ठाकरे गट नाराज



संजय राऊतांनी घेतली राज ठाकरेंची भेट

■ **मुंबई :** राज्यातील २९ महानगरपालिकांच्या महापौरपदाची आरक्षण सोडत आज जाहीर झाली. मात्र, त्याआधी काल कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत मोठा राजकीय भूकंप झाला. निवडणुकीच्या महिनाभरापूर्वी आकाराला आलेली ठाकरे बंधूंची (उद्धव आणि राज ठाकरे) युती केडीएमसीमधील एका निर्णयामुळे धोक्यात आली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने स्थानिक पातळीवर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतल्याने राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली आहे. याच पार्श्वभूमीवर डॅमेज कंट्रोल करण्यासाठी शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत आज सकाळीच राज ठाकरे यांच्या 'शिवतीर्थ' या निवासस्थानी दाखल झाले.

कल्याण-डोंबिवलीत एकूण १२२ जागा असून बहुमतासाठी ६२ नगरसेवकांची आवश्यकता आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकीचे निकाल पाहता कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. शिवसेना शिंदे गटाला ५३, भाजपला ५०, शिवसेना ठाकरे गटाला १० आणि मनसेला ५ जागा मिळालेल्या आहेत. भाजप आणि शिंदे गट एकत्र असल्याने त्यांचे संख्याबळ १०३ वर पोहोचते, जे बहुमतापेक्षा बरेच जास्त आहे. तरीही, मनसेच्या ५ नगरसेवकांनी शिंदे गटाला पाठिंबा दिल्याने ठाकरे गटाची मोठी कोंडी झाली आहे. ठाकरे बंधूंनी एकत्र निवडणूक लढवली असताना मनसेने घेतलेला हा वेगळा निर्णय उद्धव ठाकरे गटाला अजिबात पटलेला नाही.

कल्याण-डोंबिवलीतील कालच्या घडामोडीनंतर संजय राऊत यांनी आज राज ठाकरे यांची शिवतीर्थ या निवासस्थानी भेट घेतली. या भेटीत संजय राऊत आणि राज ठाकरे यांची केडीएमसीतील घडामोडींवर चर्चा झाल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, काल पत्रकारांशी बोलताना राऊत यांनी केडीएमसीतील मनसेच्या स्थानिक नेत्यांनी घेतलेल्या निर्णयाशी राज ठाकरे यांचा काहीही संबंध नसल्याचे सांगत युती वाचवण्याचा प्रयत्न केला. त्याबाबत राज ठाकरे पूर्णपणे अनभिज्ञ होते.

## दगडूशेठ गणपती मंदिरात गणेश जन्म सोहळा



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २२**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात माघ शुद्ध चतुथीर्ला गणेश जन्म सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला. 'जय गणेश'च्या गजरात आणि पाळण्याच्या सुमधुर स्वरात लाडक्या बाप्पाचा जन्मोत्सव सुवर्णपाळण्यात संपन्न झाला. यावेळी शेकडो गणेशभक्तांनी उपस्थिती लावली.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. पारंपरिक वेशात आलेल्या महिलांनी पाळणा आणि गणेश गीते गायली. संगीता रासने, मृणालिनी रासने, ज्योती सूर्यवंशी, शारदा गोडसे, तृप्ती चव्हाण, पूनम चव्हाण, वर्षा केदारी, अर्चना भालेराव यांसह अनेक महिलांनी यात सहभाग घेतला.


ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष माणिक चव्हाण, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सहचिटणीस अमोल केदारी, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, यतिश रासने, सौरभ रायकर, मंगेश सूर्यवंशी, सिद्धार्थ गोडसे यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. प्रथमेश कापरे यांनी सपत्नीक गणेश जन्माची पूजा केली. मंदिरावर शुभचिन्हे आणि मोदकांची फुलांमध्ये आकर्षक आरास करण्यात आली होती. गणेशजन्म सोहळ्यानिमित्त बुधवारी पहाटे भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांचे नातू विराज जोशी यांनी श्रींच्या चरणी गायनसेवा अर्पण केली. गुरुवारी पहाटे ३ वाजता ब्रह्मणस्पती सूक्त अभिषेक आणि गणेश सूक्त अभिषेक संपन्न झाला. सकाळी ६ ते १० आणि दुपारी १.३० ते सायंकाळी ५ यावेळेत गणेश यागाचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी दगडूशेठ गणपती मंदिरापासून नगरप्रदक्षिणा मिरवणूक थाटात निघाली, ज्यात मोठ्या संख्येने गणेशभक्त सहभागी झाले होते.

# स्पर्धा परीक्षांसाठी खराब रेटिंग असणारे परीक्षा केंद्र

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २२ :**

पुणे महापालिका ज्युनियर अभियंता परीक्षा अचानक खासगी, कमी दर्जाच्या व खराब रेटिंग असणाऱ्या केंद्रांवर घेण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. यावर काँग्रेससह सर्वच प्रमुख विरोधी पक्षांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे संपूर्ण राज्यातील उमेदवारांमध्ये तीव्र नाराजी व गोंधळ निर्माण झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

काँग्रेसने या प्रकरणी म्हटले आहे की, राज्यातील सर्व स्पर्धात्मक आणि भरती परीक्षा अनेक वर्षांपासून अधिकृत, सुरक्षित आणि विश्वासार्ह TCS iON केंद्रांवर सुरळीतपणे पार पडत आहेत. मात्र 25 जानेवारी 2026 रोजी होणारी पुणे महानगरपालिका ज्युनियर अभियंता परीक्षा अचानक खाजगी, कमी दर्जाच्या आणि खराब रेटिंग असलेल्या केंद्रांवर घेण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. या निर्णयामुळे संपूर्ण राज्यातील उमेदवारांमध्ये तीव्र नाराजी आणि गोंधळ निर्माण झाला आहे.



उमेदवारांकडून आधीच भरमसाठ परीक्षा शुल्क आकारूनही, स्वतःच्या शहरापासून 300-400 किमी दूर खाजगी केंद्रावर परीक्षा द्यावी लागणे हे अत्यंत गैरसोयीचे व अन्यायकारक आहे. प्रवासाचा खर्च, राहण्याची सोय, वेळेची उधळपट्टी, धावपळ आणि मानसिक ताण या सर्वांचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या तयारी व आत्मविश्वासावर होत आहे.

यापूर्वी अनेक भरती परीक्षांमध्ये खाजगी केंद्रांवर तांत्रिक बिघाड, गैरप्रकार, अव्यवस्था आणि व्यवस्थापनातील त्रुटी

### काँग्रेससह विरोधी पक्षांची सरकारवर टीका

दिसून आल्याने विद्यार्थ्यांचा विश्वास आधीच कमी झाला आहे. अशा परिस्थितीत पुणे महानगरपालिका सारख्या महत्त्वाच्या भरती प्रक्रियेसाठी खाजगी, कमी दर्जाच्या केंद्रांचा वापर करणे हे पूर्णपणे अव्यवहार्य आणि विद्यार्थ्यांवर अन्याय करणारे आहे.

आज राज्यभरातील हजारो उमेदवार अचानक जाहीर झालेल्या दूरच्या केंद्रांमुळे त्रस्त आहेत. खाजगी केंद्रांचा निर्णय तातडीने मागे घेऊन परीक्षा केंद्रांचे पुनर्नियोजन करणे अत्यावश्यक आहे.

अन्यथा विद्यार्थ्यांच्या मानसिक, आर्थिक आणि शैक्षणिक नुकसानीसाठी पुणे महानगरपालिका प्रशासन जबाबदार राहील. या संपूर्ण लढ्यात ठरवक विद्यार्थ्यांसोबत ठामपणे उभी आहे. अधिकृत TCS iON केंद्रांवरच परीक्षा घ्या. विश्वास, सुरक्षितता आणि पारदर्शकतेशी तडजोड मान्य नाही, असे काँग्रेसने म्हटले आहे.

# लहान भावाने केला मोठ्या भावाचा खून

■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. २२ :**

आईसोबत वाद घालतो, या कारणातून लहान भावाने मोठ्या भावाचा चाकूने वार करून खून केल्याचा प्रकार बुधवारी (दि. 21) सायंकाळी आडगाव परिसरातील सोसायटीत घडला. संदीप विजय गायकवाड (33) असे खून झालेल्या युवकाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आडगावला सद्भावना पोलिस हाउसिंग सोसायटीतील फ्लॅट 17 मध्ये दुपारी संदीप आणि अरविंद गायकवाड या दोघा भावांमध्ये वाद झाले. लहान भाऊ अरविंद हा मद्यधुंद अवस्थेत होता. दोघांत वाद होताच अरविंदने संदीपच्या छातीत चाकू खुपसला. त्याला गंभीर जखमी अवस्थेत मेडिकल कॉलेजमध्ये दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच त्याला डॉक्टरांनी मृत घोषित केले.

आडगाव पोलिसांना कळवले असता पथकाने घटनास्थळी धाव घेतली. संशयिताला मद्यधुंद अवस्थेत ताब्यात घेतले. आईला विचारले असता, लहान मुलगा अरविंद हा जेवण करण्यापूर्वी कांदा कपात असताना वाद घालत होता. मोठा मुलगा संदीप समजावण्यासाठी गेला असता वाद झाले आणि संदीपचा खून झाल्याचे आईने सांगितले. याप्रकरणी वैभव वाकेकर यांच्या फियार्दीवरून आडगाव पोलिस ठाणयात रात्री उशिरा खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. वरिष्ठ निरीक्षक उमेश पाटील पुढील तपास करत आहेत.

## पलाश मुच्छलविरोधात फसवणुकीचा आरोप

■ **वृत्तसंस्था, सांगली, दि. २२**

पलाश मुच्छलविरोधात थेट सांगली येथे आर्थिक फसवणुकीची तक्रार दाखल करण्यात आली आहे. ही तक्रार स्मृती मानधनाचा बालमित्र विज्ञान माने याने सांगली जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. विज्ञान माने हा फिल्म इंडस्ट्रीत अभिनय क्षेत्रात कार्यरत असून, त्याने पलाश मुच्छलने आपली सुमारे ४० लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप केला आहे. तक्रारीनुसार, नजरिया नावाच्या चित्रपटाचे दिग्दर्शन आपण करणार असल्याचे सांगत पलाशने विज्ञान मानेला त्या चित्रपटात गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले.

चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाल्यानंतर २५ लाखांच्या गुंतवणुकीवर सुमारे १२ लाख रुपयांचा नफा मिळेल, असे आश्वासन त्याने दिले होते. यासोबतच चित्रपटात अभिनयाची संधी देण्याचेही आमिष दाखवण्यात आले होते.

# नेताजी सुभाषचंद्र बोस : समताधिष्ठित राष्ट्रनिर्मितीचा तेजस्वी मार्ग

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा केवळ राजकीय सत्तांतराचा दस्तऐवज नसून तो भारतीय समाजाच्या आत्मसन्मानाचा, सामाजिक परिवर्तनाचा आणि मानवी प्रतिष्ठेच्या पुनर्स्थापनेचा प्रदीर्घ संघर्ष आहे. या संघर्षात अनेक थोर नेत्यांनी आपले विचार, कृती आणि बलिदान यांच्या माध्यमातून राष्ट्राला नवी दिशा दिली. मात्र या सर्वांमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे व्यक्तिमत्त्व विलक्षण तेजस्वी, धैर्यशील आणि दूरदृष्टीपूर्ण होते. नेताजी हे केवळ सशस्त्र क्रांतीचे नेतृत्व करणारे योद्धा नव्हते, तर ते भारतीय समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि नैतिक पुनर्रचनेचे स्वप्न पाहणारे महान समाजचिंतक होते. २३ जानेवारी १८९७ रोजी ओडिशातील कटक येथे जन्मलेले नेताजी संपूर्ण आयुष्य देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी झटले.

---

नेताजींच्या जीवनकार्याचा विचार करताना हे स्पष्टपणे जाणवते की, त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्याचा अर्थ अत्यंत व्यापक होता. परकीय सत्तेपासून मुक्त होणे हे स्वातंत्र्याचे केवळ पहिले पाऊल आहे, असे ते मानत. त्यांच्या मते, खरे स्वातंत्र्य तेव्हाच प्राप्त होईल, जेव्हा भारतीय समाजातील प्रत्येक व्यक्तीला सामाजिक न्याय, आर्थिक संधी, मानवी सन्मान आणि सुरक्षित जीवनाचा अधिकार मिळेल. जात, धर्म, वर्ग, लिंग किंवा भाषेच्या आधारे होणारा भेदभाव संपुष्टात येऊन समतावादी समाजरचना निर्माण होणे, हाच त्यांच्या स्वातंत्र्यसंकल्पनेचा केंद्रबिंदू होता.

नेताजींच्या सामाजिक जाणिवेची मुळे त्यांच्या बालपणातच रुजलेली दिसतात. ब्रिटिश सत्तेच्या अन्यायकारक धोरणांचा, भारतीयांवरील अपमानास्पद वागणुकीचा आणि देशातील दारिद्र्याचा त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला होता. शिक्षणाच्या काळात स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा त्यांच्या मनावर खोलवर प्रभाव पडला. आत्मगौरव, आत्मविश्वास, सेवा, त्याग आणि मानवतावाद या मूल्यांनी नेताजींच्या व्यक्तिमत्त्वाची घडण केली. आयसीएससारख्या सर्वोच्च सेवेत यश मिळवूनही त्या पदाचा त्याग करून त्यांनी स्वातंत्र्यलढ्याचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय केवळ राजकीय नव्हता, तर तो सामाजिक बांधिलकीचा आणि नैतिक धैर्याचा ठोस आविष्कार होता.

भारतीय समाजातील जातीय विषमता आणि अस्पृश्यता ही नेताजींसाठी अत्यंत वेदनादायी बाब होती. जन्माच्या आधारे माणसामाणसांत भेद करणे हे अमानवी असून राष्ट्राच्या एकात्मतेसाठीही घातक आहे, असे त्यांचे ठाम मत होते.

जातिव्यवस्थेमुळे समाजाचा मोठा वर्ग शिक्षण, रोजगार, सामाजिक सन्मान आणि मानवी हक्कांपासून वंचित राहिला होता. नेताजींनी या अन्यायाविरुद्ध केवळ शब्दांत नव्हे, तर कृतीतूनही संघर्ष केला.

आजाद हिंद सेनेत जात, धर्म किंवा प्रांत यांचा कोणताही भेद न ठेवता सर्वांना समान संधी देण्यात आली. सैनिकांना एकाच पंक्तीत उभे राहून भोजन करणे, समान शिस्त पाळणे आणि एकाच ध्येयासाठी लढणे, ही सामाजिक समतेची जिवंत उदाहरणे होती.

स्त्री-सक्षमीकरण हा नेताजींच्या सामाजिक कार्याचा अत्यंत महत्त्वाचा आणि क्रांतिकारी पैलू होता. त्या काळातील भारतीय समाजात स्त्रियांना प्रामुख्याने दुय्यम आणि मर्यादित भूमिका दिली जात होती. मात्र नेताजींनी स्त्रियांकडे राष्ट्रनिर्मितीतील समान भागीदार म्हणून पाहिले.

आजाद हिंद सेनेतील राणी झाशी रेजिमेंट ही भारतीय इतिहासातील स्त्री-मुक्तीची ऐतिहासिक घटना होती. स्त्रियांना शस्त्र हातात घेऊन राष्ट्रासाठी



लढण्याची संधी देणे म्हणजे केवळ लष्करी धोरण नव्हते, तर ते सामाजिक क्रांतीचे प्रतीक होते.

नेताजींच्या मते, जो समाज आपल्या अर्ध्या लोकसंख्येला दुर्लक्षित ठेवतो, तो समाज कधीही खऱ्या अर्थाने स्वतंत्र आणि प्रगत होऊ शकत नाही.



डॉ. राजेंद्र बगाटे
९९६०१०३५८२
bagate.rajendra5@gmail.com
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

नेताजींच्या सामाजिक विचारांमध्ये आर्थिक न्यायाला अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. ब्रिटिश राजवटीत भारतीय अर्थव्यवस्था शोषणावर आधारित होती. शेतकरी, कामगार आणि कष्टकरी वर्ग दारिद्र्य, कर्जबाजारीपणा आणि असुरक्षिततेच्या गर्तेत अडकलेला होता.

नेताजी समाजवादी विचारसरणीने प्रभावित होते. त्यांच्या मते, स्वातंत्र्यानंतर भारताने अशी आर्थिक व्यवस्था स्वीकारली पाहिजे, जिथे संपत्ती काही मोजक्या लोकांच्या हातात केंद्रित न राहता समाजाच्या सर्व घटकांच्या कल्याणासाठी वापरली जाईल. राज्याने लोककल्याणकारी भूमिका बजावून आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी सर्वांपर्यंत पोहोचवाव्यात, अशी त्यांची भूमिका होती.

धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकात्मता हे नेताजींच्या सामाजिक कार्याचे अत्यंत महत्त्वाचे आधारस्तंभ होते. भारत हा विविध धर्म, भाषा आणि संस्कृतींचा देश आहे आणि ही विविधताच भारताची खरी ओळख आहे, असा त्यांचा विश्वास होता.

ब्रिटिशांनी फोडा आणि राज्य करा या धोरणातून धार्मिक आणि सामाजिक तेढ निर्माण केली होती. नेताजींनी या धोरणाचा तीव्र विरोध केला. आजाद हिंद सेनेत हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन सर्वजण एकत्र येऊन जय हिंदचा नारा देत लढत होते. हा नारा केवळ युद्धघोष नव्हता, तर सामाजिक एकात्मतेचे आणि राष्ट्रीय ऐक्याचे प्रतीक होता.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, असे नेताजी ठामपणे मानत. ब्रिटिश शिक्षणपद्धती ही भारतीयांना मानसिक गुलामगिरीत ठेवणारी आहे, अशी त्यांची टीका होती.

शिक्षणातून केवळ नोकरदार तयार न होता स्वाभिमानी, राष्ट्रभक्त आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव असलेले नागरिक घडले पाहिजेत, असे त्यांचे मत होते. युवकांनी शिक्षणाचा उपयोग केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी न करता समाजाच्या उन्नतीसाठी करावा, असा त्यांचा आग्रह होता.

नेताजींच्या सामाजिक विचारांमध्ये शिस्त, कर्तव्यभावना आणि नैतिक मूल्यांना अत्यंत महत्त्व होते. त्यांच्या मते, स्वातंत्र्य म्हणजे केवळ अधिकार नव्हे, तर जबाबदाऱ्यांची जाणीवही आहे. आजाद हिंद सेनेतील कठोर शिस्त ही केवळ लष्करी गरज नव्हती, तर भावी भारतीय समाजासाठीचा नैतिक आदर्श होती. भ्रष्टाचार, स्वार्थ आणि नैतिक अधःपतन यांचा त्यांनी तीव्र निषेध केला.

युवाशक्तीवर नेताजींचा अपार विश्वास होता. युवक हे राष्ट्राचे खरे शिल्पकार असून सामाजिक परिवर्तनाची जबाबदारी त्यांच्यावरच आहे, असे ते मानत. भीती, न्यूनगंड आणि निष्क्रियता यांचा त्यांनी तीव्र निषेध केला. ध्येयासाठी सर्वस्व अर्पण करण्याची तयारी, त्यागाची वृत्ती आणि राष्ट्रासाठी बलिदान देण्याची क्षमता हीच युवकांची खरी ओळख असावी, असा त्यांचा संदेश होता.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे सामाजिक कार्य आजच्या काळात अधिकच अर्थपूर्ण वाटते. वाढती आर्थिक विषमता, बेरोजगारी, स्त्री-असमानता, सामाजिक तणाव आणि सांप्रदायिकता यांसारख्या समस्या आजही आपल्या समाजासमोर उभ्या आहेत. अशा परिस्थितीत नेताजींचा समतावादी, शिस्तप्रिय आणि राष्ट्रकेंद्री दृष्टिकोन आपल्याला मार्गदर्शक ठरतो. त्यांच्या विचारांमध्ये केवळ संघर्षाची भाषा नाही, तर समाजबांधणीची स्पष्ट दिशा आहे.

२३ जानेवारी रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करताना त्यांच्या केवळ शौर्याचे नव्हे, तर त्यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या स्वप्नाचे स्मरण करणे अत्यंत आवश्यक आहे. सामाजिक न्याय, समता, बंधुता, स्त्री-समानता, आर्थिक समतोल आणि मानवी प्रतिष्ठेवर आधारित भारत निर्माण करणे हेच नेताजींना खरे अभिवादन ठरेल. नेताजी हे इतिहासातील एक महान योद्धा नसून ते आजही भारतीय समाजाच्या आत्म्याला प्रेरणा देणारे जिवंत विचार आहेत.

# वसंतपंचमी एक सृजनपर्व!

भारतीय कालगणनेनुसार वसंत पंचमी माघ महिन्यातील शुक्ल पक्षातील पाचवी तिथी असते.

मकर संक्रांतीनंतर सूर्य हळूहळू उत्तरयाणात उत्तर दिशेकडे सरकतो आणि वायुमंडलात उष्णता वाढायला सुरुवात होते. हा बदल भारतीय उपखंडात खूप आल्हादायक असतो. या काळात तीव्र थंडीपासून मुक्तता मिळते.

माघ वसंत पंचमी ते फाल्गुन पौर्णिमा या चाळीस दिवसांच्या संक्रमण काळानंतर खऱ्या अर्थाने उन्हाळ्याची चाहूल लागते. आपल्या संस्कृतीत प्रत्येक महिन्याच्या तिथी ह्या विशेष महत्वागांने परिपूर्ण आहेत. त्यापैकीच एक वसंत पंचमी होय.



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९१३०८३५४५८

वसंत पंचमीलाच दक्षिण भारतात 'श्री पंचमी' म्हणतात. 'श्री' हे लक्ष्मी देवीचे एक नाव आहे.वसंत पंचमी विषयी पौराणिक आख्यायिका सांगितल्या जाते. ती, भगवान शंकराशी संबंधित आहे.

भगवान शंकर एकदा तपश्चर्या करीत असताना, तारकासुर नावाच्या दानवाने सर्वत्र उच्छाद मांडला होता.या तारकासुराला वर होता की, त्याचा वध भगवान शंकराच्या पुत्राद्वारेच होऊ शकतो.

एके दिवशी भगवान शंकर गहण तपास बसले होते. त्यांचे परत लग्न होणे शक्य नव्हते. त्यांच्या पहिल्या पत्नी सतीने अग्नि समाधी घेतली होती. तेवढ्यात सती ही पार्वती बनवून परत आली.

भगवान शंकराला प्रसन्न करण्यासाठी तिने कठोर तपश्चर्या केली. परंतु भगवान शंकर हलले सुद्धा नाहीत. मग पार्वती देवीने कामदेवाला शंकरांना ध्यानातून बाहेर काढण्यासाठी पाठविले. कामदेवाने शंकराची तपश्चर्या भंग केली. तो दिवस वसंत पंचमीचा होता.

भगवान शंकरांना आकर्षित करण्यासाठी त्यांनी कैलासावर भ्रामक वसंत ऋतू निर्माण केला आणि भगवान शंकर क्रोधीत झाले, या कृतीमुळे कामदेवाला त्यांनी भस्मसात केले. पार्वतीला भगवान शंकराने पत्नी म्हणून स्वीकार केला. त्यानंतर कार्तिकेय नावाचा मुलगा झाला. याच कार्तिकेयने तारकासूर दानवाचा वध केला.

परंपरेनुसार, वसंत पंचमी हा दिवस सरस्वती पूजनाचा दिवस मानला जातो. देवी सरस्वती ही विद्या व सुजनशीलतेची देवी आहे. वसंत पंचमीच्या दिवशी सरस्वती देवीला पिवळे वस्त्र परिधान केले जाते.

याने या सणाचे आणि सरस्वतीने नदीचे नाते अधोरेखित होते.पूरातनकाळी अनेक ऋषींनी आश्रमावस्थेत सरस्वती नदीच्या किनारी आपल्या आश्रम बांधलेत. महर्षी वेदव्यासांनी सुद्धा सरस्वती नदीच्या किनारी वेद,महा उपनिषदांसारखे अनेक ग्रंथ लिहिलेत. त्यामुळे सरस्वती नदीला म्हणजेच विद्येच्या देवेतेशी जोडले गेले.

वसंत पंचमी ही त्रिदेवाशी संबंधित तर आहेच, शिवाय ज्ञान, ऐश्वर्य आणि सृजनशक्ती या तीन मूल्ये संवर्धित करण्याचा दिवस सुद्धा आहे. पुरातनकाळी वसंत पंचमी पासून तर फाल्गुन पौर्णिमेपर्यंत वसंत उत्सव साजरा केला जात असल्याचे सांगितले जाते.

विद्यमान काळात वसंत पंचमी देशाच्या विविध भागात भिन्न प्रकारे साजरे होती. पंजाब मध्ये पतंग उडवून पतंगोत्सव साजरा करतात. पिवळे वस्त्र आणि पिवळ्या रंगाचा भात खातात. शीख बांधव पिवळ्या रंगाची पगडी घालतात, तर राजस्थान मध्ये देवतांना या दिवशीच्या चमेलीचा हार अर्पण करतात.

वसंत पंचमी ही 'ज्ञान पंचमी' आणि 'श्री पंचमी' म्हणून परिचित आहे. जी पूर्णतः सरस्वती देवीला समर्पित आहे. जी वाणी,बुद्धी, ज्ञान, आणि कलेची देवता आहे. शिवाय या दिवसांपासून वसंत ऋतूची अधिकृत सुरुवात मानली जाते. ज्यामुळे निसगार्तील वृक्षांना नवीन पालवी फुटते.

बळीराजा शेतकार्याची नवीन सुरुवात करतो, तर विद्यार्थी गण नवं अभ्यासास प्रारंभ करतात. एकंदरीत वसंत पंचमी ही निसर्गाप्रती कृतज्ञता भाव, तप, कला, प्रेम, ज्ञान आणि सृजनशीलतेचा उत्सव प्रदान करणारी आहे. जी सदैव नवकार्य आणि उत्कर्षाची प्रेरणा देते.

## अकोला महापालिकेचे

# महापौर पद ओबीसी महिला राखीव

■अकोला,दि.२२ (प्रतिनिधी)■

अकोला महानगरपालिकेचे महापौरपद इतर मागासवर्गीय (OBC) महिला प्रवर्गासाठी राखीव जाहीर झाल्याने शहराच्या राजकारणात नव्या घडामोडींना सुरुवात झाली आहे. या आरक्षणामुळे केवळ महिला नेतृत्वालाच नव्हे तर OBC समाजाला सत्तेच्या केंद्रस्थानी येण्याची मोठी संधी मिळणार आहे. महापौरपदाच्या आरक्षणाची घोषणा होताच प्रमुख राजकीय पक्षांमध्ये अंतर्गत हालचाली वाढल्या असून, संभाव्य महिला उमेदवारांची नावे चर्चेत येऊ लागली आहेत. अनेक पक्षांकडून अनुभवी नगरसेविका, सामाजिक कार्यात सक्रिय असलेल्या महिलांवर भर दिला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**राजकीय पक्षांची गणिते बदलणार**

राजकीय विश्लेषकांच्या मते, OBC



महिला आरक्षणामुळे पारंपरिक राजकीय समीकरणेबदलूशकतात.जइउमतदारसंघमोठ्या प्रमाणात असलेल्या अकोला शहरात हा निर्णय मतपेढीवर थेट परिणाम करणारा ठरणार आहे. त्यामुळे प्रत्येक पक्ष OBC समाजात आपली पकड मजबूत करण्यासाठी रणनीती आखताना दिसत आहे.महापौरपद मिळवण्यासाठी युती, अंतर्गत समझोते तसेच नगरसेवकांच्या पाठिंब्यावर विशेष लक्ष दिले जात आहे. काही पक्षांमध्ये उमेदवारीवरून अंतर्गत स्पर्धा वाढण्याचीही चिन्हे आहेत.

**महिला सशक्तीकरणाला चालना**

हा निर्णय महिला सशक्तीकरणाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा सहभाग वाढावा आणि निर्णय प्रक्रियेत त्यांची भूमिका मजबूत व्हावी, या उद्देशाने केलेले हे आरक्षण अकोल्याच्या राजकीय इतिहासात महत्त्वाचा टप्पा ठरण्याची शक्यता आहे.

**पुढील काही दिवस निर्णायक**

महापौरपदासाठी कोणत्या पक्षाची महिला उमेदवार बाजी मारते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. येत्या काही दिवसांत पक्षांकडून अधिकृत भूमिका स्पष्ट होणार असून अकोल्याच्या राजकारणात चुरशीचे चित्र पाहायला मिळणार आहे.

## भाजपाकडे महापौरपदासाठी १३ दावेदार

■अकोला,दि.२२ (प्रतिनिधी)■

आरक्षणानुसार महापौरपद महिला ओबीसीसाठी राखीव झाल्याने विविध पक्षांत हालचालींना वेग आला आहे.भाजपकडे एकूण १३ ओबीसी महिला नगरसेविका/नेत्या असून, यामुळे भाजपची दावेदारी मजबूत मानली जात आहे. महापौरपदासाठी वैशालीताई शेळके, पल्लवी मोरे, योगिता पावसाळे, मंजुषाताई शेळके, शिल्पाताई वरोकार, रश्मी अवचार, निकिता देशमुख, अंधारे ताई, शारदाताई खेडकर, नीतू जगताप, माधुरी क्षीरसागर, काकड ताई आणि ॲड. कल्पनाताई गोटे ही नावे चर्चेत आहेत.या १३ दावेदारांपैकी कोणाच्या गळ्यात महापौरपदाची माळ पडणार, याकडे शहराचे लक्ष लागले आहे. पक्षांतर्गत चर्चा, वरिष्ठ नेत्यांची भूमिका तसेच सामाजिक व राजकीय समीकरणांवर अंतिम निर्णय अवलंबून राहणार आहे.

## मराठी भाषा विभागातर्फे ‘बोलींचा जागर’

### भाषाविज्ञानात संशोधन आवश्यक : विद्यापीठाकडून नव्या अभ्यासक्रमांची रचना कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर




■अकोला,दि.२२ (प्रतिनिधी)■

भाषेच्या संशोधन, संवर्धनाच्या अनुषंगाने साहित्याइतकेच भाषाविज्ञानही महत्वाचे आहे. हे लक्षात घेऊन रिद्धपूर येथील मराठी भाषा विद्यापीठाकडून नव्या अभ्यासक्रमांची रचना करण्यात येत आहे, असे प्रतिपादन मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.अविनाश आवलगावकर यांनी आज येथे केले.

मराठी भाषा विभाग, भाषा संचालनालय, मराठी भाषा विद्यापीठातर्फे श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालयात आयोजित ’बोलींचा जागर’ कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. राज्याचे भाषा संचालक अरुण गीते, उपसंचालक संतोष गोसावी, विद्यापीठाचे विशेष कार्य अधिकारी राम राठोड, भारतीय सेवा सदनचे अध्यक्ष दिलीपराज गोयनका, प्राचार्य डॉ. चारुशीला रुमाले, जिल्हा माहिती अधिकारी हर्षवर्धन पवार, डॉ.रामदास चवरे, प्रा. भगवान डोहळे, प्रकाश चव्हाण, समन्वयक डॉ.स्वप्नील इंगोले आदी यावेळी उपस्थित होते.कुलगुरू डॉ. आवलगावकर म्हणाले की, भारतीय ज्ञानपरंपरा समृद्ध असून, तिच्याकडे केवळ आध्यात्मिक भूमिकेतून न पाहता वैज्ञानिक दृष्टीतून पाहिले पाहिजे. शास्त्रीय दृष्टीतून पाहिल्यास आपल्या ज्ञानपरंपरेच्या समृद्धी व सामर्थ्याची जाणीव होते. समाजात भाषा टिकण्यासाठी बोली टिकली पाहिजे. त्यासाठी व्यवहारात स्वभाषेचा वापर आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येकाने आग्रही राहिले पाहिजे.पारधी आणि कलाली या मराठी बोलीभाषांबाबत कलाली बोली भाषातज्ज्ञ डॉ.रामदास चवरे, प्रा. भगवान डोहळे, तसेच पारधी बोली भाषातज्ज्ञ प्रकाश चव्हाण यांची व्याख्याने झाली. मराठी ही विविध बोलींनी समृद्ध असून, तिचे संवर्धन आवश्यक असल्याचे प्रतिपादन विविध मान्यवरांनी यावेळी केले.कार्यक्रमाचा प्रारंभ ग्रंथदिंडीने झाला. यावेळी विविध लोककलांचे सादरीकरणही करण्यात आले.

## हिवरखेड नगरपरिषदेत भाजपाला शिंदेसेनेचा छुपा पाठिंबा..?

### उपाध्यक्ष सह भाजपाचे चारही सभापती बिनविरोध

■हिवरखेड,दि.२२ (प्रतिनिधी)■

येथे उपाध्यक्ष सह चार सभापतीच्या निवडी संपन्न झाल्या यामध्ये एकाही पदावर शिवसेनेने आपला उमेदवार उभा न केल्या मुळे भाजपाला शिवसेना शिंदे गटाचा छुपा पाठिंबा तर नाही ना असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.हिवरखेड येथे नव्यानेच निर्माण झालेल्या नगर परिषदेची निवडणूक पार पडले या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीने नगराध्यक्ष पदासह आपले पूर्ण पॅनल लढविले तर त्याविरुद्ध शिंदेसेनेने सुद्धा नगराध्यक्ष पदासह आपले काही उमेदवार शिंदेसेनेवर उभे केले या निवडणुकीमध्ये भाजपाने नगराध्यक्ष व ११ नगरसेवक निवडून आणून बहुमत मिळिवले तर शिंदे सेनेला केवळ पाचच नगरसेवक निवडून आणता आले निकालानंतर काही दिवसापूर्वी उपाध्यक्ष पदाचे निवडणूक घेण्यात आली यामध्ये शिंदे सेनेला आपला उमेदवार उभा करता आला असता मात्र शिंदे सेनेने तसे




न करता भाजपाला अविरोध उपाध्यक्ष पद मिळवून दिले तसेच १९ तारखेला विविध विषय समित्यांच्या सभापतीच्या निवडी घेण्यात आल्या यामध्ये सुद्धा शिंदेसेनेने भाजपाच्या बांधकाम, पाणीपुरवठा, स्वच्छता व आरोग्य तसेच महिला व बालकल्याण हे चारही सभापती निवडणुकीत शिंदेसेने कडून कोणताही अर्ज नसल्यामुळे भाजपाचे चारही सभापतीं अविरोध निवडून आले. उपाध्यक्ष व सभापती निवडणुकीत शिंदे सेनेला आपले उमेदवार उभे करता आले असते मात्र शिंदे सेनेने तसे न केल्यामुळे भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष व चारही सभापती बिनविरोध निवडून आले. यामुळे शिंदे सेनेची भूमिका संशयास्पद असून भाजपाला छुपा पाठिंबा तर दिला नाही ना ? असा प्रश्न आता नागरिकांना पडला आहे.

## स्मार्ट मीटर असेल तरच दिवसा वीज वापराची सवलत

■अकोला,दि.२२ (प्रतिनिधी)■

महावितरणकडून राज्यातील घरगुती वीज ग्राहकांसाठी ’टीओडी’ अर्थात स्मार्ट मीटरच्या माध्यमातून दिवसाच्या वीज वापरामध्ये प्रतियुनिट ८० पैसे ते १ रूपयापर्यंत सवलत देण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने पुढील पाच वर्षासाठी निश्चित केलेल्या वीज दरानुसार घरगुती ग्राहकांना टीओडीप्रमाणे वीज दरात सवलत १ जुलै २०२५ पासून सुरू केली आहे. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी टीओडी मीटर आवश्यक असल्याचे करण्यात आले. महावितरणकडून दरम्यान, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तयार स्पष्ट करण्यात आलेले स्मार्ट मीटरव्दारे स्वयंचलित मीटरचे वाचन होत असल्याने अचूक बिले मिळत असून होत असलेला अचुक वीजबिलासोबत दिवसा वीज वापराचा लाभ वीज ग्राहकांना मिळावा यासाठी जीनस कंपनीसोबत महावितरणने टीओडी मीटर बसविण्याच्या कामाला गती दिली आहे.

## दोनवाडा येथील विष प्राशन केलल्या इसमाचे पोलीसांचे तत्परतेने वाचले प्राण

■अकोला,दि.२२ (प्रतिनिधी)■

आज दिनांक २१/०१/२०२६ रोजी नियंत्रन कक्ष अकोला व सायबर सेल मुंबई येथुन एक इसम विष प्राशन करीत असल्याबाबतचा व्हीडीओ व लोकेशन पोलीस स्टेशन दहीहांडा येथील ठाणेदार सपोनि गोपाल ढोले यांना प्राप्त झाले. सदर व्हीडीओ ची पाहणी केली असता कीष्णा राघु पालवि वय १८ वर्ष रा. शेखपुरा ता. खाकणार जिल्हा बऱ्हाणपुर हा विषाची बॉटलने विष पीत असल्याचे दिसुन आले.

तात्काळ पोलीस स्टेशन दहीहांडा येथील पथक तयार करून मिळालेल्या लोकेशन वर पाठविण्यात आले. विष घेतलेला इसम



नामे कीष्णा राघु पालवि हा ग्राम दोनवाडा येथील अजय झटाळे याचे शेतालील खोपडी मध्ये पडलेला दिसुन आला. त्यास दहीहांडा पोलीस पथक व नातेवाईक यांचे मदतीने तात्काळ पोलीस जिप मध्ये टाकुन जिल्हा सामान्य रूग्णालय अकोला येथे दाखल केल्यामुळे विष प्राशण केलेल्या इसमाचे प्राण वाचले.सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. अर्चित चांडक सा, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. चंद्रकांत रेडडी सा मा. सहायक पोलीस अधिक्षक निखील पाटिल सा. उपविभागीय कार्यालय अकोट याचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक गोपाल ढोले, ठाणेदार पोलीस स्टेशन दहिहांडा व पो.हवा. कमोद लांडगे, पो कॉ प्रमोद दळिव, यांनी केली.

## राम नामाची महिमा अगाध :हभप सुभाष महाराज

### फडके नगरच्या रामायण कथेत सीता स्वयंवर चा जल्लोष

■अकोला,दि.२२ (प्रतिनिधी)■

भारतीय व्यवस्थेत राम हे संस्कृतीचे आराध्य असून प्रभू रामचंद्राची महिमा अघाध आहे. सृष्टीतील सर्व आदर्श गुण प्रभू रामचंद्र मध्ये विराजमान असून अशा आदर्शमय प्रभू रामचंद्र पासून युवकांनी आदर्शवादी गुण घेणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन रामायण कथाकार हभप सुभाष महाराज चव्हाण यांनी केले. स्थानीय फडके नगरच्या हनुमान मंदिर उत्सव समितीच्या वतीने हनुमान मंदिर येथे सुरू असलेल्या संगीतमय रामायण कथेत बुलढाणा येथील हभप सुभाष महाराज चव्हाण यांनी गुरुवारच्या सत्रात सीता स्वयंवरची भक्तीपूर्ण कथा सांगितली. ते पुढे म्हणाले,भगवान श्री रामापासून सर्व गुण शिकता येतात. प्रजेचे उत्तम रक्षण कसे करावे, मित्रत्व कसे निभवावे,आदर्श संसाराची निर्मिती कशी करावी आदी गुण सर्व गुणसंपन्न श्रीराम ापासून प्राप्त करता येऊ शकतात. यासाठी साधनेची गरज असल्याचे सांगून त्यांनी राम भक्तीची महिमा यावेळी प्रतिपादित केली.



सत्राच्या उत्तरार्धात सीता स्वयंवरची झाकी कथेच्या अनुषंगाने साकार करण्यात आली. ही झाकी बघण्यासाठी परिसरातील महिला पुरुषांनी कथा स्थळी एकच गर्दी केली होती. सर्वप्रथम पूजा यजमान संतोष घोगरे, सौ अनुराधा घोगरे यांनी हभप सुभाष महाराज यांचे स्वागत केले. दरम्यान आदल्या रात्रीच्या कीर्तनात तामसी बटवाडीचे कीर्तनकार हभप किशोर महाराज काळे यांनी कीर्तन सादर करीत भक्तीची महिमा प्रतिपादित केली. चिरंतन व शाश्वत सुखासाठी सत्संग व प्रभू भक्तीची गरज असून या मार्गानेच जीवनाचा उद्धार होत असून हा मार्ग प्राप्त करण्याचे आवाहन त्यांनी केले. दिनांक २६ जानेवारी पर्यंत आयोजित या उत्सवात रामायणाचार्य हभप सुभाष महाराज चव्हाण यांची रामायण कथा सकाळी ९-३० ते १२-३० ते दुपारी ३ ते ६ वाजेपर्यंत होत असून रात्री ८ वाजता किर्तन उत्सव होत आहे.या कीर्तन उत्सवात आज शुक्रवार दिनांक २३ जानेवारी रोजी मोर्शी येथील हभप प्रदीप महाराज पडोळे यांचे कीर्तन होणार आहे.शनिवार दिनांक २४ जानेवारी रोजी झाशी पडशी येथील हभप प्रमोद महाराज राहणे, रविवार दिनांक २५ जानेवारी रोजी हभप सुभाष महाराज चव्हाण यांचे कीर्तन होऊन सोमवार दिनांक २६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता हभप तुकाराम महाराज सखारामपुरकर इलोरा यांचे काल्याचे किर्तन होऊन या संगीतमय रामायण व किर्तन महोत्सवाची सांगता होणार आहे.

## श्री गणेश जयंतीनिमित्त अथर्वशीर्षाच्या गजराने परिसर भक्तिमय

### तीन हजार विद्यार्थ्यांनी म्हटले एक लक्ष वेळा अथर्वशीर्ष

■अकोला,दि.२२ (प्रतिनिधी)■

श्री गणेश जयंतीच्या पावन पर्वावर भक्ती, श्रद्धा आणि मंत्रोच्चारांचा अद्भुत संगम अनुभवायला मिळाला. वेदपाठी ब्राह्मणवृंदांच्या मंत्रोच्चारात गणेश यागात आहुती अर्पण केल्यानंतर श्री सिद्धिविनायक गणेश मंदिरात बुधवार, २२ जानेवारी रोजी सकाळी ८.३० वाजता तब्बल तीन हजार विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या सहभागातून एक लक्ष वेळा गणपती अथर्वशीर्ष पठण करण्यात आले. हजारो बालकांच्या आणि युवकांच्या कंठातून निनादलेल्या अथर्वशीर्षाच्या स्वरांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला.

हा भक्तिपूर्ण उपक्रम भारत शिक्षण प्रसारक मंडळ, श्री सिद्धिविनायक गणेश मंदिर आणि नीलेश देव मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. भव्य मंडपात सकाळी विधीवत श्री गणेशाचे पूजन करण्यात आले. त्यानंतर दुग्धाभिषेक, गणेश याग व हवन करण्यात



आले. यज्ञकुंडातून उठणाऱ्या पवित्र धुरासह मंत्रोच्चारांनी वातावरण अध्यात्मिक ऊर्जेने भारून गेले.पूजाविधीनंतर तीन हजार विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शंखनाद करीत एकत्रितपणे अथर्वशीर्ष पठणास सुरुवात केली. ॐ गं गणपतये नमःच्या घोषात विद्यार्थ्यांची तन्मयता आणि भक्ती पाहून उपस्थित भाविक भारावून गेले. अथर्वशीर्ष पठणामुळे ज्ञान, विवेक, बुद्धी आणि सद्बुद्धीची उपासना घडत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या कार्यक्रमाला भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अनिल पिंपरकर, भारत विद्यालयाचे उपमुख्याध्यापक योगेश मल्लेकर, विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका संगीता कोकीळ, प्रा. नरेंद्र देशपांडे, नगरसेवक नीलेश देव यांच्यासह निनाद आठवले, प्रभाकर दोड, अग्निहोत्री, जयंत सरदेशपांडे,प्रविण हिवराळे, राजेंद्र गुन्नलवार, भास्कर बैतवार, नीलेश पवार, सोमनाथ मोटे, रामहरी डांगे, विजय वाघ आदी मान्यवर व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन प्रा.रश्मी देव यांनी केलं व आभारप्रदर्शन जयंतराव सरदेशपांडे

श्री गणेश जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांच्या सहभागातून साकारलेला हा धार्मिक उपक्रम संस्कार, श्रद्धा आणि अध्यात्मिक मूल्यांचे संवर्धन करणारा ठरला. अथर्वशीर्षाच्या गजराने श्री सिद्धिविनायक मंदिर परिसर दिव्य, पावन आणि भक्तिरसाने ओतप्रोत झाला.

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज
महासागर
प्रिंट | ई-पेपर | डिजिटल | युट्यूब
सर्व काही एका छताखाली

दै. महासागर, दै. युवराष्ट्र दर्शन, नागपूर पोस्ट (इंग्रजी) आणि संपूर्ण डिजिटल प्लॅटफॉर्म, महासागर मीडिया ग्रुप आज प्रिंटपासून डिजिटलपर्यंत सर्व माध्यमांत सक्षमपणे कार्यरत आहे.

दररोज वाचनीय – दै. महासागर

**दै. महासागर** हे केवळ वृत्तपत्र नाही, तर ज्ञान, संस्कार, विचार आणि संवेदनशीलतेचा ५५ वर्षांचा अखंड प्रवास आहे. दररोज वाचनीय, माहितीने परिपूर्ण आणि सर्व वयोगटांना सामावून घेणाऱ्या नव्या, नव्या पुरवण्यांच्या माध्यमातून एक व्यक्ती नव्हे तर अवघं कुटुंब वाचावं, हाच आमचा प्रामाणिक उद्देश आहे.

**गेल्या ५५ वर्षांपासून सामाजिकतेचा वसा जपणारे दै. महासागर,** समाजप्रबोधन, शिक्षण, संस्कृती, आरोग्य, साहित्य आणि अध्यात्म या सर्वांचा संतुलित संगम साधत आहे. आपणही या वाचनसंस्कृतीचा भाग व्हावा, हीच आमची आपेक्षा.

दर दिवशी विशेष वाचनीय पुरवणी दै. महासागर सोबत

सोमवार – कॅलिडोस्कोप
विश्वनिर्मितीपासून ते नव्या शोधांपर्यंतचा प्रवास
या सदरातून वाचकांना विज्ञान, अंतराळ, निसर्ग, तंत्रज्ञान आणि संशोधनाच्या अद्भुत विश्वात घेऊन जाण्याचा प्रयत्न केला जातो. विश्वाची निर्मिती कशी झाली, पृथ्वीचे रहस्य, आधुनिक विज्ञानातील नवे शोध, AI, अंतराळ मोहिमा, सर्व काही सोप्या, समजेल अशा भाषेत.
• विद्यार्थ्यांपासून जिज्ञासू वाचकांपर्यंत सर्वांसाठी बौद्धिक मेजवानी.

मंगळवार – जोश
तरुणाईसाठी प्रेरणादायी ऊर्जा
फॅशन, फूड, करियर, यशकथा, स्टार्टअप्स, नवे ट्रेंड्स, आजच्या नव्या दमाच्या तरुणाईला जगण्यासाठी बळ देणारे सदर म्हणजे ‘जोश’.
• अपयशातून उभे राहण्याच्या कथा, करियर मार्गदर्शन, आत्मविश्वास वाढवणारे लेख
• जीवनात "मीही करू शकतो" हा विश्वास निर्माण करणारे विचार

बुधवार – निरामय
चांगल्या आरोग्यासाठी खास मार्गदर्शन
आरोग्य ही खरी संपत्ती आहे, हेच या सदराचे सूत्र. दैनंदिन आरोग्य टिप्स, आहार, व्यायाम, मानसिक आरोग्य, तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन, सर्वसामान्यांना उपयोगी पडेल असे व्यवहार्य आरोग्यज्ञान येथे मांडले जाते.
• आजारांपेक्षा आरोग्य जपण्यावर भर.

गुरुवार – अस्मिता
छंद, कौशल्य आणि नव्या निर्मितीचा शोध
माणूस केवळ नोकरीने नाही, तर त्याच्या छंदानेही जगतो.
लेखन, चित्रकला, संगीत, हस्तकला, फोटोग्राफी, उद्योजकता,
स्वतःमधील सुप्त कला ओळखण्यास मदत करणारे सदर.
• व्यक्तिमत्त्व विकास आणि आत्मसन्मान वाढवणारे लेखन.

शुक्रवार – भक्ती मार्ग
भक्ती, श्रद्धा आणि जीवनमूल्यांचा मार्ग
भक्तीचा मार्ग शेवटी सुखाकडे नेतो,
काय चांगले, काय वाईट, कर्म,कर्तव्य, देवाचा महिमा आणि माणूस म्हणून आपली जबाबदारी
या साऱ्यांवर चिंतन करणारे आध्यात्मिक सदर.
• मनाला शांतता, जीवनाला दिशा देणारे विचार.

शनिवार – बालांगण
लहानग्यांचे निरागस विश्व
मुलांना काय हवे आहे, काय नको
त्यांचे भावविश्व, शिक्षण, खेळ, संस्कार, पालकांसाठी मार्गदर्शन
या सर्वांचा समतोल साधणारे सदर.
• उद्याच्या पिढीचा विचार आजच.

रविवार – साहित्य मैफिल
शब्दांची, विचारांची आणि भावनांची मेजवानी
कविता, कथा, लेख, समीक्षा,भ्रमंती लाईव्ह स्टोरी सदर
नवोदित व प्रस्थापित लेखकांचे दर्जेदार साहित्य
दै. महासागरची साहित्यिक परंपरा जपणारे हे सदर.
• साहित्यप्रेमींना विचारांची समृद्धी देणारे व्यासपीठ.

‘खरीखरी’ हा विशेष अग्राग्रलेख
दररोज ज्येष्ठ संपादक व विचारवंत **श्रीकृष्ण चांडक** यांचा **‘खरीखरी’** हा विशेष अग्राग्रलेख दै. महासागरमध्ये नियमितपणे प्रसिद्ध होतो.दररोज स्वतःच्या नावाने अग्रलेख लिहिणारे ते राज्यातील पहिले वृत्तपत्र मालक, संचालक संपादक ठरले आहेत.‘खरीखरी’ या सदरातून ते कोणताही आडपडदा न ठेवता समाज, राजकारण, प्रशासन आणि लोकजीवनातील वास्तव मांडतात.सत्तेच्या विरोधात उभे राहण्याचे धाडस, अन्यायाविरुद्ध स्पष्ट भूमिका आणि सामान्य माणसाच्या बाजूने ठामपणे बोलण्याची ताकद, हेच या अग्राग्रलेखाचे वैशिष्ट्य आहे.

दै. महासागर म्हणजे बातम्यांसोबत विचार, वाचनासोबत संस्कार आणि समाजासोबत आपुलकी दररोज वाचनीय, दररोज उपयुक्त.

ई-पेपर – महासागर मीडिया ग्रुप
https://epaper.dainikmahasagar.in
दै. महासागर, दै. युवराष्ट्र दर्शन आणि नागपूर पोस्ट (इंग्रजी) हे सर्व वृत्तपत्रे आता जगाच्या कुठल्याही कोपऱ्यातून, कुठेही आणि कधीही सहज वाचता येतात.
• आकर्षक आणि आधुनिक मांडणी
• एका क्लिकवर सर्व पेपर्स उपलब्ध
• मोबाईल, टॅब, लॅपटॉपवर सहज वाचन

डिजिटल महासागर मीडिया ग्रुप
https://dainikmahasagar.in
सर्व बातम्या एका ठिकाणी, सर्वांसाठी.
डिजिटल महासागरवर टाकलेली प्रत्येक बातमी लिंकच्या माध्यमातून तातडीने सर्वत्र पोहोचते.
• वेगवान आणि विश्वासार्ह बातम्या
• अपडेट्स रिअल टाइममध्ये
• काळ डिजिटलचा आहे आणि महासागरने त्यानुसार पुढचे पाऊल टाकले आहे.

महासागर युट्यूब न्यूज चॅनल
youtube.com / mahasagarnews
अनेक दर्जेदार शो, ग्राउंड रिपोर्टिंग, रोजच्या राजकीय-सामाजिक घडामोडी, महासागर मीडिया ग्रुपच्या सर्व लाईव्ह अपडेट्स आणि सेम टीव्हीच्या धर्तीवर उभे राहत असलेले डिजिटल व्हिडिओ साम्राज्य.
• लाईव्ह रिपोर्टिंग
• ग्राउंड रिॲलिटी
• लोकांच्या प्रश्नांना थेट व्यासपीठ

प्रिंटचा विश्वास, डिजिटलचा वेग आणि समाजासाठी पत्रकारिता.
महासागर मीडिया ग्रुप बातमी सर्व सामान्यांच्या मनातली.

महासागर अकोला पान ६ ●शुक्रवार,दि.२३ जानेवारी २०२६

## पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांचा दौरा



**अकोला :** राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेत जिल्हा नियोजन समितीची बैठक उद्या (२३ जानेवारी) दु. १२ वा. नियोजनभवनात होणार आहे.त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे : सकाळी ११.४५ वा. जिल्हाधिकारी कार्यालयात आगमन व राखीव, दु. १२ वा. जिल्हा नियोजन समितीची बैठक, दु. २ वा. एकत्रित आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनांची आढावा बैठक, सोयीनुसार खामगावकडे प्रयाण.

## पातुर नगर परिषदेच्या मालकीच्या जागेवर बांधकाम

- न.प. कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन लेखी पत्र देऊन जाब विचारला तथा पंचनामा केला
- सन २००५ मध्ये सदर भूखंड घोटाळ्याप्रकरणी झाले होते गुन्हे दाखल



पातुर शहरातील झोपडपट्टी क्रमांक दोन जवळील उर्वरित जागा नगरपरिषद ची असून या ठिकाणी बांधकाम करण्यात येत असल्याची तक्रार प्राप्त झाल्यावर आम्ही कर्मचारी येथे पंचनामा करण्यासाठी आलो आहे सदर जागे प्रकरणी संबंधितांना न्यायालयात सुद्धा खेचले आहे सदर जागेच्या सातबारावर नगरपरिषद मालक म्हणून नोंद आहे
–पंकज जोपले, टाऊन प्लॅनर पातुर नगरपरिषद

■पातुर,दि.२२ (प्रतिनिधी)■

पातुर तालुका प्रतिनिधी येथील संभाजी चौक ते तू का वी चौक कडे जाणाऱ्या रस्त्यालगत उत्तरेस सहाशे चाळीस चौरस मीटर खुल्या भूखंडावर गेल्या चार पाच दिवसापासून कॉलमचे गड्डे खोदून लोहा टाकून बांधकाम सुरू करण्यात आले आहे त्यामुळे सदर भूखंड नगरपरिषद च्या मालकीचा सरकारी असल्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत होता तर या प्रकरणी पातुर नगरपरिषद मुख्याधिकारी यांच्याकडे नागरिकांनी तक्रारी केल्यावरून दिनांक २१ जानेवारी २०२६ ला पातुर नगरपरिषद चे कर्मचारी प्रमोद घोडे काजळे साहेब टाऊन प्लॅनर पंकज जोपले आदींनी सदर घटनास्थळी भेट देऊन बांधकाम कोणत्या आधारावर सुरू करण्यात आले त्याची माहिती मागितली जोपर्यंत माहिती देत नाही तोपर्यंत बांधकाम बंद ठेवण्याचे नगरपरिषद कर्मचारी यांनी ठणकावून सांगितले तथा सदर घटनास्थळी बांधकामाचा पंचनामा केला

सविस्तर वृत्त असे आहे की सदर जागा नगरपरिषद ची असल्याची नोंद पातुर नगर परिषद च्या रजिस्टर वर होती तर तत्कालीन उपअधीदर्शक गाजीउरहमान तथा कर संग्रहक गजानन पाटील यांनी संगणमत करून शासकीय रजिस्टर मधील नगरपरिषद ची जागा यावर व्हाइटनर मारून सदर जागेवर मालक म्हणून अब्दुल सत्तार अब्दुल रज्जाक यांचे नाव टाकून तशी असिस्टमेंट नक्कल तयार करून दिली त्या असेसमेंट नक्कल च्या आधारावर अशोक बंड, किसन उंबरकर,गजानन परमाळे,आदींनी सदर जागेची खरेदी करून घेतली सदर प्रकार जागे जवळअसलेले झोपडपट्टी क्रमांक दोनच्या नागरिकांनी याबाबत उठाव केला होता कारण सदर जागेमध्ये वीस ते तीस वर्षांपूर्वी शंभर ते दीडशे गोरगरिबांचे घरे होती सदर घरे सरकारी जागेत असून अतिक्रमित घरांवर पातुर नगरपरिषदेने संपूर्ण घरे तोडून कारवाई केली होती मात्र सदर जागेवर येथील नागरिकांनी मालकी हक्क दाखवताच येथील झोपडपट्टी मधील नागरिकांनी मोठे आंदोलन उभे केले होते तर सदर प्रकरणी पातुर नगर परिषदेचे तत्कालीन नगराध्यक्ष मोहम्मद मुस्ताक मोहम्मद मंनशा यांनी पातुर पोलिसात कर संग्रहक गजानन पाटील उपअधीदर्शक गाजीउर रहमान तथा खरेदी करून घेणारे यांचे विरुद्ध अ प क्रमांक ७५ /०५ कलम ४०८,४२०,४६८,४७१ ३४ भादविनुसार पातुर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता तर महाराष्ट्र शासनाच्या मालकीचा भूखंड ६०० चौरस मीटर हा आपले रजिस्टर मध्ये खोड खाड करून असेसमेंट नक्कल खोटी बनवून दुसऱ्याच्या नावाने रजिस्टर मध्ये त्याची नोंद करून भूखंडाची विक्री करण्यासाठी जमिनीचा प्रथम मालक याच्या नावाने करून तिची विक्री केली व दस्तावेज बदलविले म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला होता तर ज्या असेसमेंटच्या नकलच्या आधारावर खरेदी करण्यात आली होती ती खरेदी बनावट खोटी असून तात्काळ रद्द करावी असे पत्र तत्कालीन मुख्याधिकारी वाघ साहेब यांनी पातुर दुय्यम निबंधक यांना दिले होते

### वैशिष्ट्यपूर्ण कला महोत्सवाचा दुसरा दिवस

## विविध सादरीकरणातून समृद्ध लोकसंस्कृतीचे दर्शन



■अकोला,दि.२२ (प्रतिनिधी)■

सांस्कृतिक कार्य विभागातर्फे वैशिष्ट्यपूर्ण कला महोत्सवाच्या दुस–या दिवशी विविध कलाप्रकारांच्या सादरीकरणातून कलावंतांनी महाराष्ट्रातील समृद्ध लोकसंस्कृतीचे दर्शन घडविले. त्याला उपस्थितांनी भरभरून दाद दिली.प्रमिलाताई ओक नाट्यगृहात महोत्सवाच्या दुस–या दिवशी पातूर येथील शाहीर विशाल राखोंडे व लोककवी सागर राखोंडे संच, साने गुरुजी कला व सांस्कृतिक क्रीडा बहु.मंडळ व स्व.विनायक राखोंडे प्रतिष्ठान यांच्या कलावंतांनी महाराष्ट्राची लोककला सादर करून उपस्थितांना जिंकून घेतले. या कलावंतांनी वासुदेव, गोंधळ, भारुड, कलापथक, खडी गंमत अशा महाराष्ट्रातील विविध कलांचे गीत–नृत्यातून सुरेख सादरीकरण केले. या प्रत्येक सादरीकरणाने रसिकांची वाहवा मिळवली. सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनात, तसेच सांस्कृतिक संचालक विभीषण चवरे यांच्या नियोजनात या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. सचिन गिरी यांनी आभार मानले.



## नरनाळा महोत्सवासाठी स्वयंसेवकांची आवश्यकता: अर्ज मागविले

■अकोला,दि.२२ (प्रतिनिधी)■

नरनाळा निसर्ग पर्यटन व सांस्कृतिक महोत्सव दि.३० जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान होणार असून, त्यासाठी स्वयंसेवकांची आवश्यकता आहे. इच्छूकांनी दि. २६ जानेवारीपर्यंत पोर्टलवर किंवा अकोट वन्यजीव विभाग येथे प्रत्यक्ष अर्ज सादर करावेत, असे आवाहन उपवनसंरक्षक राहूलसिंह टोलिया यांनी केले आहे.पर्यटकांना मार्गदर्शन, माहिती देणे, नोंदणी व स्वागत व्यवस्था, स्वच्छता, विविध कामांत व आपत्कालीन स्थितीत सहकार्य आदी कामे स्वयंसेवकांकडून होणे अपेक्षित आहे.

अर्ज करण्यासाठी किमान पात्रता दहावी उत्तीर्ण असून, वनविभागात पूर्वीचा अनुभव असलेले व स्थानिक उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. अर्जात नाव, पत्ता, ई–मेल, मोबाईल क्र., शैक्षणिक अर्हता, इच्छूक कामाचे स्वरूप आदी नमूद करणे आवश्यक आहे. त्यासाठी narnalafest.in या पोर्टलवर अर्ज दि. २६ जानेवारीपूर्वी करावा. अधिक माहितीसाठी ए.एम. तराळे, मुख्य लेखापाल, अकोट वन्यजीव विभाग, अकोट भ्र.क्र.–९९६०८४६०८०, तसेच पोर्टलबाबत माहितीसंदर्भात ई मेल–admin@narnalafest.in भ्र.क्र.७८४०९३५३७२ या क्रमांकावर संपर्क साधावा.निवड झालेल्या स्वयंसेवकांना कार्यालयामार्फत दि.२७ जानेवारी रोजी कळिवण्यात येईल व दि. २८ जानेवारीला ओळखपत्र देऊन कार्यपालनाबाबत आवश्यक सुचना देण्यात येतील. वनविभागाच्या www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावरही सूचना पहावयास मिळतील.

### श्री बालादेवी इंग्लिश स्कूल ॲड ज्युनिअर कॉलेज पातुर येथे

## मकर संक्रांतीनिमित्त रंगला हळदीकुंकू व महिलांसाठी आनंदोत्सव



■पातुर,दि.२२ (प्रतिनिधी)■

श्री बालादेवी इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, पातुर येथे मकर संक्रांतीनिमित्त पारंपरिक हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त व भरघोस प्रतिसाद लाभला.दैनंदिन कामाच्या धावपळीतून महिलांना थोडीशी उसंत मिळावी, आनंदाचे क्षण अनुभवता यावेत या उद्देशाने विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये उखाणे स्पर्धा, संगीत खुर्ची यांसारख्या खेळांमध्ये महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला.विविध खेळ, आणि महिलांचा प्रतिसाद यामुळे संपूर्ण शाळेचा परिसर हा खूप उत्साहित झाला होता. महिलांनी मनमुराद आनंद लुटत कार्यक्रमाचा मनापासून आस्वाद घेतला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व महिलांना हळदीकुंकू देऊन सन्मानित करण्यात आले.असा हा पारंपरिकतेसोबतच आनंद आणि एकोप्याचा संदेश देणारा मकर संक्रांतीचा कार्यक्रम सर्वांसाठी स्मरणीय ठरला.

## आकोट येथे शिवजयंती उत्सव समितीची कार्यकारिणी गठीत

### शिवाजी नगर येथे भव्य शिवजयंती उत्सव साजरा होणार; बैठक व कार्यक्रमांचे नियोजन

■अकोट,दि.२२ (प्रतिनिधी)■

येथील शिवाजी नगर परिसरात होणाऱ्या भव्य शिवजयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शिवजयंती उत्सव समिती आकोटची कार्यकारिणी गठीत करण्यात आली. दिनांक २१ जानेवारी २०२६, बुधवार रोजी स्थानिक ठिकाणी बैठक पार पडली. आगामी १९ फेब्रुवारी २०२६ रोजी निर्मीती नागोबा संस्था, शिवाजी नगर यांच्या वतीने मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात येणार आहे. या बैठकीदरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. त्यानंतर उत्सवाच्या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. शिवजयंती निमित्त विविध सामाजिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक कार्यक्रम मोठ्या प्रमाणात आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. यावेळी मान्यवर नानासाहेब शिंगारे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच समितीच्या कार्यकारिणीत प्रदीप गौरी, राजेश नागमते, प्रभुदास तळोकार, पुरुषोत्तम चौखंडे, गोपाल पेंढीकर, शंतनू खवले यांचा समावेश असून पवन सपकाळ यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.कार्यकारिणी सदस्य म्हणून अक्षय जायले, निखिल झाडे, विकी मोरे, राहुल माकोडे, प्रवीण टाकळकर, ओम घोडे, आनंद शिवरकर, नवीन काळे, प्रथमेश मेहकर, पियुष लहाने, सोयल वानखडे, शुभम सोळंके, तेजस भालक, तिलक कोल्हाट, मर्दानी वाघ, संजय गोरे गोलू भगत, सुभाष मिसाळ, वाघ आदींची उपस्थिती होती.शिवजयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## पातुर तालुक्यातील जांभरुण येथे गाय व गोऱ्या ची चोरी

■पातुर,दि.२२ (प्रतिनिधी)■पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या यातील फिर्यादी विठ्ठल बाबुराव बळकर वय २३ वर्षे राहणार जाभरून यांची गाय व गोरा लाल रंगाचा घराच्या अंगणामध्ये बांधलेला होता दिनांक २२/१/२०२६च्या रात्री एक वाजताच्या च्या सुमारास कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चार चाकी वाहनामध्ये जबरीने टाकून नेले असल्याचे दिसले गाईला चार महिन्याचे वासरू आहे गायीची व गोऱ्या ची किंमत ३०००० रुपये ती गाडी बाबुळगाव कडे आली आणि बाबुळगाव मध्ये पातुर पोलीस स्टेशनची पेट्रोलिंग ची गाडी असल्यामुळे गाडी परत भरधाव वेगाने आलेगाव कडे गेली त्या गाडीला जांभरून मध्ये गाईच्या मालकांनी. थांबवण्याचा प्रयत्न केला मात्र गाडी अंगावर आणल्याने तो तेथून पळून गेला पोलिसांनी सुद्धा आलेगाव कडे त्या गाडीचा पाठलाग केला मात्र तो दिसून आला नाही याबाबत पातुर पोलिसात कलम ३०३ (२) इछड प्रमाणे पा तूर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे

## बस स्टँड परिसरात अस्वच्छतेचा स्फोट, रस्त्यांची चिखलवाट

■मुर्तिजापुर,दि.२२ (प्रतिनिधी)■

शहराच्या मध्यवर्ती बस स्टँडजवळील सार्वजनिक प्रसाधनगृहे वर्षानुवर्षे बंद अवस्थेत अडगळीत पडून असून, नागरिकांसह महिला प्रवासी व व्यापाऱ्यांची प्रचंड कुचंबना होत आहे. प्रभाग क्रमांक ९ मधील या गंभीर प्रश्नाकडे नगरपरिषदेचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष सुरू असल्याचा आरोप करत नगरसेवक निलेश ऊर्फ गंपू रमेश शर्मा यांनी प्रशासनावर जोरदार टीका केली आहे. बस स्टँड, ऑटो स्टँड व मार्केट हा सर्वाधिक वर्दळीचा भाग असूनही प्रसाधनगृह सुविधा बंद असल्याने महिलांना अपमानास्पद परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. नाइलाजाने रेल्वे स्टेशनकडे धाव घ्यावी लागते, तेथे दंडात्मक कारवाईचा त्रास सहन करावा लागतो. परिणामी परिसरात उघड्यावर लघुशंकेचे प्रकार वाढून घाणीचे साम्राज्य पसरले असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. विशेष म्हणजे हा परिसर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकासमोरचा असल्याने शहराच्या प्रतिमेलाही काळिमा फासला जात आहे.दुसरीकडे, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते



चिखली गेटदरम्यानच्या रस्त्याची अक्षरशः चाळण झाली असून अपघातांचा धोका वाढला आहे. बस स्टँड व रेल्वे स्टेशन जोडणारा हा मुख्य मार्ग असूनही पीडब्ल्यूडीची उदासीनता कायम आहे. तातडीने डांबरीकरण व मजबुतीकरण न झाल्यास शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नगरसेवक गंपू शर्मा यांनी दिला आहे. आता प्रशासन जागे होते की आंदोलनाची ठिणगी पेटते, याकडे शहराचे लक्ष लागले आहे.

## बिबट्याचा बछड्यावर हल्ला

**अकोट :** अकोट तालुक्यात सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या गावात गेल्या काही दिवसापासून वाघांचा वावर वाढला आहे त्यामुळे शेतकरी शेतमजूर यांच्यामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. अशातच अकोट तालुक्यात पुनर्वसीत झालेल्या कुंड येथील भुरी मोतीलाल जामुनकर या आदिवासी महिला शेतात ढोरे चारत असताना बिबट्याने अचानक हल्ला करून तीन वर्षाच्या गायीच्या बछड्यावर ताव मारला.दरम्यान, सदर ठिकाण आमच्या क्षेत्रात येत नसल्याचे वन विभागाचे कर्मचारी सांगत असल्याने आदिवासी बांधव न्यायच्या प्रतीक्षेत आहेत.

**अकोला:** प्रभात किड्स स्कूलचा अर्णव पटेल व रोशन खारोडे ह्या खेळाडूंनी विभागस्तरीय कॅरम स्पर्धेत उत्कृष्ट यश प्राप्त केल्याने त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

**CHANGE IN NAME**
I Have Change My Name in My DAUGHTER'S Passport **No is (P3426580)**
From --
**RAVIKIRAN JAGGANNATH PHALKE**
--TO--
**RAVIKIRAN JAGANNATH PHALKE**
My Residential Address is -- Near Hanuman Temple Kaulkhed Road Gaytri Nagar Akola Maharashtra 444004

**CHANGE IN NAME**
I have Changed My Name Form
DURAYYA SALIM ALI
TO
DURRIYAH SALEEMALI
My passport Number - P1039527
My residential Address in Near Lal bangla, Mominpura Gazi Market, June Bus Stand, Akola Akola 444001

## अकोटमध्ये जलविभागाचे दुर्लक्ष; पोलीस स्टेशनसमोर पाईपलाईन फुटली

■अकोट,दि.२२ (प्रतिनिधी)■

शहरातील जलपुरवठा व्यवस्थेकडे जलविभागाच्या अधिकाऱ्यांचे गंभीर दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. दि. २१ जानेवारी २०२६ (बुधवार) रोजी शहर पोलीस स्टेशनसमोर मुख्य पाईपलाईन फुटल्याने मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात आहे. मात्र, संबंधित अधिकारी व कर्मचारी याकडे गांभीर्याने लक्ष देत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पोलीस स्टेशनसमोर तसेच अकोला रोड परिसरातील उपविभागीय कार्यालयाच्या मध्यभागी पाईपलाईन फुटून पाणी रस्त्यावर वाहत असल्याचे चित्र दिसून येत आहे. यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला असून, अनेक भागातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. जलविभागाचे अधिकारी व पाईपलाईन दुरुस्ती करणारे कर्मचारी घटनास्थळी वेळेवर न पोहोचल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. पाणी टंचाईच्या काळात अशा प्रकारे पाणी वाया जाणे ही अत्यंत गंभीर बाब असून, जलसंपदा व जलविभागाने तातडीने लक्ष देऊन पाईपलाईन दुरुस्त करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. तसेच यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना व लोकप्रतिनिधींना निवेदन देण्याची तयारी नागरिकांनी दर्शविली आहे. या प्रश्नाबाबत आमदार प्रकाश पाटील भारसाकळे यांनाही निवेदन देऊन हस्तक्षेप करण्याची मागणी करण्यात येणार असल्याचे नागरिकांनी सांगितले. निवडून आलेले लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांनी केवळ आश्वासने न देता प्रत्यक्षात काम करावे, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.जलविभागाच्या निष्काळजीपणामुळे सामान्य व गरीब नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याने, यापुढे अशा प्रकारचे दुर्लक्ष होऊ नये व पाणीपुरवठा व्यवस्थेवर नियमित लक्ष ठेवावे, अशी जोरदार मागणी होत आहे.

## सर्व दु:खावर नामचिंतन हाच उपचार:हभप उमेश महाराज जाधव

■अकोला,दि.२२ (प्रतिनिधी)■

आज वैद्यकीय विश्वात उपचाराच्या अनेक शाखा अस्तित्वात आहेत. अलोपॅथी, आयुर्वेद, होमिओपॅथी अश्या उपचार पद्धतीने रुग्ण आपल्या रोगाचा इलाज करीत असतात. मात्र दुःख मुक्ती,मानसिक वा आत्मिक शांती, अर्थप्राप्ती, वा शाश्वत सुखाच्या प्राप्तीसाठी भक्तिमार्गात एकच उपचार पद्धती अस्तित्वात असून ती म्हणजे भगवंताचे नाम चिंतन होय.या एकाच उपचार पद्धतीने मनुष्य लौकिक दुःखातून कायमचा रोगमुक्त होऊ शकतो.यासाठी भगवत नाम चिंतन अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन हभप उमेश महाराज जाधव यांनी केले.स्थानीय फडके नगर येथील हनुमान मंदिर येथे सुरू असलेल्या संगीतमय रामायण व कीर्तन उत्सवात कीर्तनाचे द्वितीय पुष्प नांदगाव खंडेश्वर येथील कीर्तनकार हभप उमेश महाराज जाधव यांनी गुंफले.संत तुकोबाराय यांच्या अभंगवार त्यांनी आपले संगीतमय कीर्तन सादर केले.ते म्हणाले, ज्याप्रमाणे अग्नी द्वारे आपण पाणी गरम करू शकतो,दूध गरम करू शकतो, अन्न शिजवू शकतो, त्याचप्रमाणे भगवंताच्या नाम चिंतन रुपी अग्नीने आपण कोणतेही कर्म करीत असताना पापमुक्त होऊन भगवंताच्या अनुग्रहाचे अधिकारी होऊ शकतो. ते म्हणाले, जीवनात मिळवायचे काय ? यापेक्षा मिळवले काय? याचा विचार होणे गरजेचे आहे.ते म्हणाले, प्रपंच हा देहा करीता आहे व देह हा भगवंता करीता आहे. जेवढा वेळ आम्ही संसाराला देतो तेवढा वेळ परमार्थाला दिला पाहिजे. मात्र




जो तो या भौतिक सुखाच्या विवचनेत आहे. प्रपंचात जो तो आपल्या वैभवाचे गोडवे गातो. आपला आबा शंभर वर्ष जगला असे फुशारकीने सांगतो. मात्र याची उपलब्धी काय याच्या कोणी विचार करीत नाही. प्रपंच कुणालाही चुकत नाही. तो करावाच लागतो. पण तो कसा करावा याचा कोणीच खुलासा आजपर्यंत केला नसल्याचे त्यांनी सांगितले. ते म्हणाले, संसार हा प्रारब्धाचा भाग आहे. प्रपंचा करता जेवढे जिवापाड प्रयत्न करता, शेवटी पदरात काय पडते ? दुसऱ्या करिता जगता जगता स्वतःसाठी जगणे आपण केव्हाचे विसरून गेलो. प्रपंचाचे दुख हे केवळ संतांना कळते. म्हणून संत म्हणतात की जे झाले मागचे, ते सोडून द्या, आता पुढचे बघा, पुढील आयुष्य हे प्रभूप्राप्तीच्या मार्गात नाम चिंतनाच्या माध्यमातून खर्ची करावे. उगीच व्यसनांच्या नादी लागून आपला देह हा व्यसनाधीन न करता तो देशभक्ती, प्रभुभक्तीत लावून खरा आदर्श भक्तिमार्गात व समाजात निर्माण करून शाश्वत सुखाची प्राप्ती करण्याचा हितोपदेश हभप उमेश महाराज जाधव यांनी यावेळी दिला.सर्वप्रथम हभप उमेश महाराज यांचे रामायण प्रवचनकार हभप सुभाष महाराज चव्हाण यांच्या उपस्थितीत समितीच्या वतीने शाल श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. तर दैनिक अन्नदाते सतीश काळे, चंद्रशेखर वानखडे यांचे ही स्वागत करण्यात आले. संचालन खरपकर गुरुजी,मेजर बुडूकले यांनी केले. सोमवार दिनांक २६ जानेवारी पर्यंत आयोजित या उत्सवात हभप सुभाष महाराज चव्हाण, बुलढाणा यांची संगीतमय रामायण कथा सकाळी ९–३० ते १२–३० ते दुपारी ३ ते ६ वाजेपर्यंत होत असून कीर्तन सेवा रात्री ८ ते १० वाजेपर्यंत सुरू आहे.

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. Group Editor-in-Chief and Managing Director - Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak. Local Editor Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक स्थानिक संपादक : "पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९" (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील )

# ये तो होना ही था!




भालचंद्र ठोंबरे
९८३४३५०८९५

मुंबई महानगरपालिका ही भारतातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका आहे. मुंबईचे आर्थिक बजेट हे भारतातील अरुणाचल प्रदेश, सिक्कीम ,त्रिपुरा, गोवा या राज्यांच्या बजेट पेक्षा जास्त आहे. २०२४ - २५ या आर्थिक वषार्साठी हे बजेट ५९ हजार ९५५ कोटी रुपयाचे होते. तर २०२५ - २६ साठी हे अंदाजे ७४ हजार कोटी चे वर प्रस्तावीत आहे.

अशा श्रीमंत महानगरपालिकेवर सत्ता असणे हे प्रमुख राजकीय पक्षासाठी भूषणावह असू शकते. या मुंबई महानगरपालिकेवर १९९७ ते २०२५ या २८ वर्षाच्या कालखंडात शिवसेनेची सत्ता होती. प्रामुख्याने मराठी माणूस , मराठी माणसाची अस्मिता यावर शिवसेनेचे राजकारण आधारीत आहे. त्यामुळे मुंबई ही मराठी अस्मितेचे शिवसेनेच्या राजकारणाचे व ठाकरे कुटुंबीयांच्या प्रभावाचे केंद्र मानले जाते.

**महायुतीला बहुमत**

नुकत्याच पार पडलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजप व शिंदेसेना यांच्या महायूतीने एकूण २२७ जागापैकी भाजपा ८९ व शिवसेना शिंदे गट २९ अशा एकूण ११८ जागा मिळवीत बहुमता एवढे यश संपादन केले व जवळपास २८ वषार्पासून मुंबई वर सत्ता गाजविणाऱ्या ठाकरे कुटुंबीयाची सत्ता संपुष्टात आली. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाला ६५ तर राज ठाकरेंच्या मनसेला ६ जागा मिळाल्या.

मराठी बाणा व मराठी अस्मिता हा मुद्दा करून निवडणूक लढविणाऱ्या ठाकरे बंधूंना मतदारांनी सीमित यश दिले, पण सत्ता नाकारून मराठी अस्मिता हा मुद्दा आता तेवढा प्रभावी ठरत नाही याची जाणीव करून दिली. किंबहुना ठाकरे बंधू मराठी अस्मितेचा मुद्दा केवळ निवडणुकीपुरताच वापरतात अन्यथा त्यांच्या कृतीतून त्याचे समर्थन केलेले कधीही दिसले नाही. असा जणू संदेशच या मतदानातून व्यक्त केला आहे.

**बाळासाहेबांच्या विचारांशी फारकत**

उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेचा झालेला हा पराभव अनपेक्षित नव्हता तर तो अपेक्षितच होता. मराठी माणूस अद्यापही आपल्या पाठीशी पूर्णपणे उभा आहे हा उद्धव ठाकरेंच्या भ्रमाचा भोपळा मतदारांनी काही प्रमाणात फोडला आहे.

उद्धव ठाकरेंसाठी हे अनपेक्षित असेलही कदाचित परंतु उद्धव सेनेने भाजपची साथ सोडून नंतर केलेली वाटचाल पाहता हे अनपेक्षित नव्हते. हे केव्हा तरी घडणारच होते, आणि खरे म्हणजे जेव्हा उद्धव ठाकरेनी सत्तेसाठी ाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना तिलांजली दिली, तेव्हाच भविष्यातील या घटनेची निश्चिती झाली होती.

उबाठाच्या पराभवाची अन्य अनेक कारणे सांगता येण्यासारखी असली तरी माननीय बाळासाहेबांच्या विचाराशी व ध्येय धोरणाशी घेतलेली फारकत हेच पराभवाचे मुख्य कारण आहे.

सत्तेसाठी उबाठाने बाळासाहेब ठाकरेच्या धोरणांशी विसंगत असलेल्या राजकीय विचारधारेच्या पक्षांशी केलेला संग हा मतदारांना रुचला नाही.त्यामुळे मराठी अस्मिता जपणाऱ्या व बाळासाहेबांना आदरणीय मानणारा मतदार उद्धव सेनेपासून दूर गेला. त्यामुळे नवीन मतदारांना आकर्षित करण्याच्या प्रयत्नात म्हणा की नादात म्हणा उद्धवसेना कधी मुस्लिमांना झूकते माप देवू लागली हे त्यांचे त्यांना स्वतःलाही कळले नाही. पण मतदारांना मात्र हे जाणवत होते.

**उबाठा सेनेचा दरारा संपला?**

१९९१ साली छगन भुजबळ आपल्या सहा आमदारासह सेना सोडून काँग्रेसमध्ये गेले. पण अनेक दिवस ते शिवसेनेच्या कार्यकर्त्यांच्या भीतीने संरक्षणात व दडपणाखालीच वावरत होते, असे त्यावेळच्या परिस्थितीवरून जाणवत होते.

मात्र शिंदे नी शिवसेनेची जी दोन शकले केली तेव्हा बाहेर पडणारे आमदार उद्धव शिवसेनेच्या कोणत्याही दडपणात नव्हते. हा शिवसेनेचा दरारा कमी झाल्याचे द्योतक होते. छगन भुजबळ, व नारायण राणे यांनी सेना सोडली. मात्र ते बाळासाहेबांना आपण अद्यापही मानतो असे जेव्हा आदराने म्हणतात तेव्हा त्यात त्यांचेवर असणारा बाळासाहेबांच्या विचारांचा, कर्तुत्वाचा प्रभाव व त्यांचे विषयीचा आदर दिसतो. मात्र असा कोणताही आदरभाव शिंदे सोबत गेलेल्या आमदारांनी उद्धव ठाकरे बद्दल व्यक्त केल्याचे अथवा त्यांच्या बोलण्यातून दिसल्याचे अथवा व्यक्त झाल्याचे जाणवले नाही. यातच उद्धव ठाकरेच्या संघटनेवरील प्रभावी नेतृत्वाचे व संघटन कौशल्याचे अपयश दडले आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

**मुद्दे प्रभावीपणे मांडण्यात अपयश**

मुंबई महानगरपालिका निवडणूक प्रचाराचे वेळी आपण जिंकून आल्यास कोणत्या योजना, कोणते प्रकल्प जनतेच्या हितासाठी राबवू ही बाब जनतेच्या मनावर बिंबविण्यात उद्धव ठाकरे व त्यांच्या सहकाऱ्यांना अपेक्षित यश मिळाले नाही असे म्हणावे लागेल.

मुंबईतून मराठी माणसाचा टक्का कमी होतोय अशी हाकाटी देताना उबाठाने आपण आपल्या कारकिर्दीत किती मराठी माणसांचे हित साधले, किती मराठी जनतेला रोजगार उपलब्ध करून दिला, किती मराठी माणसांच्या विकासाच्या योजना राबविल्या व त्याचा लाभ किती मराठी माणसांना झाला याची पूर्ण माहिती जाहीर करून स्वतःचा मुद्दा प्रभावी करण्याची संधी साधली नाही.

या उलट विरोधकांना टोमणे मारणे, (जर माध्यमावर आलेला व्हिडिओ जय श्रीराम म्हणणाऱ्यांना मी हरामखोर म्हणेन मध्ये सत्यता असेल तर ) हिंदूंच्या आस्थे विषयीच्या संदर्भात विवादित विधाने करणे अशा प्रकारची वक्तव्ये करून उद्धव ठाकरेंनी आपल्या पक्षाच्या हितचिंतकांची संख्या कमी केली.

बाळासाहेबांच्या बोलण्यातील दरारा, प्रभाव उद्धव ठाकरे किंवा मी त्यांचे सोबत काम केले मला सांगू नका असे म्हणणा?या संजय राऊत यांच्या बोलण्यात कधीच जाणवला नाही जाणवले ते फक्त टोमणे.

**दोन बंधूच्या युतीचा फायदा कोणाला?**

ठाकरे बंधूंची युती व्हावी असे अनेकांना वाटत होते. या युतीचा उद्धव ठाकरे गटाला किती फायदा झाला हे निश्चित सांगता येणार नाही मात्र अनेक ठिकाणी झिरो असणाऱ्या मनसेचे मुंबईत ६ व अन्यत्र. ७ असे एकूण १३ नगरसेवक निवडून आल्याने मनसेला प्रत्यक्षदर्शी फायदा झाला असे म्हणता येते.

राज आणि उद्धव ठाकरे यांची युती ही भाजपाच्या पथ्यावर पडली. कारण राज ठाकरेच्या पूर्व परिचीत राजकीय धोरणामुळे त्याचे महाविकास आघाडीतील अन्य पक्षाशी विशेषतः काँग्रेसशी जुळणे शक्य नव्हते. म्हणजेच उद्धव व राज ठाकरे यांची युती झाल्यास महाविकास आघाडीत फूट पडणार, तसेच परप्रांतीची मते ही उद्धव ठाकरे पासून दुरावणार, हे भाजप जाणून असल्याने ठाकरे बंधूंची झालेली युती ही भाजपाला फलदायी ठरली.

महाविकास आघाडी एकत्रित लढली असती तर उबाठाच्या दृष्टीने निकालावर बराच सकारात्मक परिणाम होण्याची शक्यता होती असे म्हणण्यास वाव आहे.

ठाकरे बंधूच्या एकत्र येण्याच्या चर्चा, एकत्र येण्यासाठी झालेला उशीर यांच्या एकत्रित येण्यामुळे आघाडीत झालेली फूट, मुंबईला महत्व दिल्यामुळे अन्य ठिकाणी प्रचारासाठी झालेले दुर्लक्ष, स्टार प्रचारकांचा अभाव, अशा सगळ्या अडचणीवर मात करूनही मुंबईत उबाठाने दिलेली लढत व जिंकलेल्या ६५ जागा व मनसेने जिंकलेल्या सहा जागा ह्या निश्चितच पक्षांसाठी कौतुकास्पद व पक्षाचे मनोबल टिकविणाऱ्या आहेत.

परंतु आता राज्यात किंवा मुंबई महानगरपालिकेत सत्ता नसल्याने अखेरपर्यंत किती नवनिर्वाचित नगरसेवक पक्षात टिकून राहतात अथवा कितीजण सत्तेच्या लालसेने अन्य पक्षांशी जवळीक साधतात. हे येणारा काळच ठरवेल.

परंतु संघटना रुपी इमारतीचा मूळ पाया असलेली बाळासाहेबांची ध्येय व धोरणांचा मुद्दाच डळमळीत झाला असल्यास इमारत मजबूत कशी राहणार? मधून मधून तिला फूट रूपी तडे जाण्याची शक्यताच जास्त असते. त्यामुळेच मुंबईची सत्ता हातून जाणे हा निकाल अनपेक्षित नव्हता तर, ये तो होना ही था !

# मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करणारे बाळासाहेब!



आज २३ जानेवारी, हिंदू हृदय सम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांची १०० वि जयंती.

बाळासाहेबांचा जन्म २३ जानेवारी १९२६ रोजी झाला. बाळासाहेबांना समाजकार्याचे बाळकडू आपल्या वडिलांकडून म्हणजे प्रबोधनकारांकडून लहानवयातच मिळाले.

प्रबोधनकारांच्या प्रबोधनाचा, पुरोगामी विचारांचा व आक्रमक वृत्तीचा वारसा बाळासाहेबांमध्येही कळत नकळतपणे उतरला.

सर्वप्रथम एक कलाकार, एक व्यंगचित्रकार म्हणून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली. १९५० साली ते फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून काम करत असतानाच बाळासाहेब विविध संस्थांसाठी, कंपन्यांसाठी व नियतकालिकांसाठी व्यंगचित्रकार तसेच जाहिरात डिझाईनचे कामही करत. याच काळात त्यांची आर. के. लक्ष्मण या विख्यात व्यंगचित्रकाराशी ओळख झाली. लवकरच या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. ही मैत्री शेवट पर्यंत टिकून राहिली. आर. के. लक्ष्मण आणि बाळासाहेब ठाकरे या दोघांनी व्यंगचित्रकलेला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

आज व्यंगचित्रकार म्हटले की याच दोघांची नावे समोर येतात. फ्री प्रेस जर्नलमध्ये काही काळ काम केल्यानंतर बाळासाहेबांनी स्वतःचे साप्ताहिक काढण्याचे ठरवले. बाळासाहेब स्वतः व्यंगचित्रकार होते त्यामुळे हे साप्ताहिक व्यंगचित्रात्मकच होते हे वेगळे सांगायला नको.

ऑगस्ट १९६७ साली बाळासाहेबांनी 'मार्मिक' हे साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाला मार्मिक हे नाव प्रबोधनकारांनी सुचवले. ऑगस्ट १९६७ मध्ये महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते मार्मिकच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन झाले. महाराष्ट्राच्या उद्धारासाठी आणि मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी सुरू करण्यात आलेले मार्मिक आजही तितक्याच जोमात सुरू आहे.

बाळासाहेबांनी ज्या उद्देशाने हे साप्ताहिक सुरू केले होते तो उद्देश सफल झाला असेच म्हणावे लागेल. मराठी माणसांच्या मुंबईतच मराठी माणसांवर होणाऱ्या अन्यायाला मार्मिकने वाचा फोडली. महाराष्ट्रातच मराठी माणसांची गळचेपी होऊ लागली. मराठीवर अन्याय होऊ लागला हा अन्याय केवळ व्यंगचित्रांच्या फटकाऱ्याने दूर होणार नाही त्यासाठी आणखी संघटित प्रयत्न करायला हवेत असा विचार बाळासाहेबांच्या मनात आला.

बाळासाहेबांनी मराठी मणसांना एक करून मोठे संघटन उभारले. या संघटनेला कोणते नाव द्यायचे असे बाळासाहेबांनी प्रबोधनकारांना विचारले. प्रबोधनकारांनी क्षणाचाही विलंब न करता नाव घेतले 'शिवसेना' यानंतर बाळासाहेबांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची अधिकृत स्थापना केली. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे ब्रीद घेऊन स्थापन झालेल्या शिवसेनेत तरुणांचा भरणा सुरू झाला.

गाव तिथे शाखा असा प्रवास करत अल्पावधीतच शिवसेना महाराष्ट्राभर पसरली. गावागावात, खेड्यापाड्यात शिवसेनेच्या शाखा स्थापन झाल्या. शिवसेनेचा पहिला मेळावा ३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवतीर्थ मैदानावर संपन्न झाला. या मेळाव्यापासूम शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवतीर्थावरील ( शिवाजीपार्क ) मराठी माणसांची प्रचंड गर्दी असे समिकरणच तयार झाले.

शिवतीर्थावर बाळासाहेबांचे भाषण ऐकण्यासाठी राज्यभरातून लोक येत. त्यांच्या वक्तृत्वाने उपस्थित जनसमुदाय भारावून जात. वक्तृत्वाबरोबरच भेदक लेखणी हे देखील बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे महत्वाचे वैशिष्ट्ये.

बाळासाहेबांनी सामना सुरू केल्यावर या लेखणीची ताकद देशाला समजली. सामना मधील बाळासाहेबांच्या अग्रलेखांची वाट पूर्ण महाराष्ट्र पाहत असे. १९९५ साली बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रभर झंझावती प्रचार केला. संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी प्रचारसभा घेतल्या. त्यांच्या सभेला लाखोंची गर्दी होऊ लागली.

आपल्या आक्रमक भाषणांनी सत्ताधारी पक्षाला त्यांनी सळो की पळो करून सोडले. बाळासाहेबांमुळेच शिवसेना भाजप युतीचे सरकार महाराष्ट्रात स्थापन झाले. मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. या सरकारने एक रुपयात झुणका भाकर, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपडपट्टी वासीयांना घरे, मुंबई - पुणे हायवे, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बे चे मुंबई नामांतर असे अनेक लोकहिताचे निर्णय घेतले.

या सर्व योजना प्रकल्पांची मूळ संकल्पना बाळासाहेबांचीच होती. आज मुंबई महाराष्ट्रात आहे याचे सर्व श्रेय बाळासाहेबांना जाते. बासाहेबांमुळेच मुंबई महाराष्ट्रात आणि मराठी माणूस मुंबईत दिमाखात राहू शकतो. बाळासाहेब नसते तर मुंबई परप्रांतीयांच्या घशात आणि मराठी माणूस मुंबईच्या बाहेर गेला असता.

बाळासाहेबांनीच मराठी माणसाला स्वाभिमानाने जगायला शिकवले. बाळासाहेबांमुळेच मराठी माणूस आज ताठ मानेने जगत आहे. मराठी माणसांसाठी त्यांनी जे केले ते इतर कोणत्याही नेत्याला करता आले नाही म्हणूनच मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. आज त्यांच्या जयंती दिनी महाराष्ट्रातील तमाम मराठी माणूस त्यांना अभिवादन करत आहे. मराठी माणसांच्या मनात स्वाभिमान जागृत करणाऱ्या बाळासाहेबांना विनम्र अभिवादन!

विवेकबुद्धी आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आरशातून

# अंधश्रद्धा निर्मूलनाचा लढा






mahasagarngp@gmail.com

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सर्वेसर्वा, शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी दूरदृष्टी आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आधारे अंधश्रद्धेविरोधात विवेकी समाज घडवण्याचे ध्येय समोर ठेवले. प्रवाहाच्या विरोधात जाऊन, मुठभर कार्यकर्त्यांच्या बळावर त्यांनी एक वैचारिक चळवळ उभी केली. विवेकाच्या आरशात समाजाने स्वतःकडे पाहावे, अंधश्रद्धेची कीड ओळखावी आणि ती समूळ नष्ट करावी,यासाठी त्यांनी समाजमन जागे केले.

शिक्षणामुळे अंधश्रद्धा नष्ट होतील, अशी अपेक्षा असतानाही सुशिक्षित माणूससुद्धा अंधश्रद्धेचा बळी ठरून आपले आयुष्य उद्धवस्त करत होता. या अस्वस्थ करणाऱ्या वास्तवातून समाजाला बाहेर काढायचे असेल, तर प्रसंगी जीवही पणाला लावावा लागेल, असा दृढ निश्चय माधव बावगे यांनी केला.

सत्य, नीती आणि विवेकी विचारांच्या कसोटीवर उभे राहून माधव बावगे यांनी स्वीकारलेला अंधश्रद्धा निर्मूलनाचा मार्ग खरोखरच सोपा होता का? निखाऱ्यावर चालण्याइतके कठीण असलेले हे कार्य आणि असामाजिक शक्तींच्या हिंसक विरोधाला सामोरे जाण्याची ताकद त्यांना कुठून मिळाली,असा प्रश्न पडतो. या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या बालपणीच्या वेदनादायी अनुभवांत दडलेले आहे.

लातूर जिल्ह्यातील आटोळा या गावी, पद्मिनबाई विश्वनाथ बावगे यांच्या पोटी त्यांचा जन्म झाला. ह्यअठरा विश्व दारिद्रय म्हणतात त्यापेक्षाही भयावह दारिद्रय त्यांच्या वाट्याला आले. अंधश्रद्धा, कर्मकांड, उपास-तापास, नवस-सायास, आजारपणात बुवाबाबा-देवीदेवतांच्या वाऱ्या, अशा प्रथांनी ग्रासलेल्या कुटुंबात कबाड कष्ट करून पोट भरणे, हाच रोजचा यक्षप्रश्न होता.

माधव बावगे हे आपल्या घरातील पहिले शिकलेले व्यक्ती. त्यांचे प्राथमिक शिक्षण आईच्या माहेरी बोकणगावी झाले; माध्यमिक शिक्षणासाठी त्यांना पुन्हा आटोळ्याला यावे लागले. आटोळा गावात अर्धी वस्ती मुस्लिम आणि इतर धर्मीयांची होती. मात्र धर्म कोणताही असो,अज्ञान, दारिद्र्य, अगतिकता आणि भीती यामुळे हे गाव अंधश्रद्धेच्या शापाखाली होते.

करणी-भानामती, देवी अंगात येणे, भूतबाधा, डाकिणी, बुवाबाबांचे चमत्कार, अंगठीतील खड्यांमुळे किंवा नरबळीमुळे फलप्राप्ती, जन्मकुंडली-प्रारब्ध-नशीब यांसारख्या बुरसटलेल्या कल्पनांनी समाज गुदमरला होता. या अंधश्रद्धांमुळे आयुष्याची राखरांगोळी होताना पाहून माधव बावगे यांच्या विवेकबुद्धीला सतत धक्का बसत राहिला.

एकीकडे या प्रथा, तर दुसरीकडे टोकाचे दारिद्र्य–यामुळे अनेकदा शाळा बुडवून त्यांना कामाला जावे लागे. आठ बैलांचा नांगर चालवणे, गुराळात व विहीर खोदण्याच्या गुत्यात काम करणे, शेतीमजुरी, गिट्टया फोडणे, आई आजारी असताना घरकाम सांभाळणे, अशा जबाबदाऱ्या लहान वयातच त्यांच्या खांद्यावर आल्या. तरीही १९७३ साली त्यांनी दहावीची परीक्षा ५५ टक्के गुणांसह उत्तीर्ण केली.

यानंतर लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयात वाणिज्य शाखेत त्यांनी प्रवेश घेतला. प्राचार्य डॉ. जे. एस. वाघमारे, प्रा. अनिरुद्ध जाधव आणि प्रा. आर. एल. कावळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांना वसतिगृह व कार्यालयातील कामाची जबाबदारी देण्यात आली. याच माध्यमातून निवास व भोजनाची सोय झाली. प्रा. आर. एल. कावळे यांनी तर त्यांचे शैक्षणिक पालकत्वच स्वीकारले.

एनएसएसच्या माध्यमातून प्रा. डॉ. सोमनाथ रोडे यांच्यासोबत त्यांनी बाबा आमटे यांच्या श्रमसंस्कार शिबिरात सहभाग घेतला. गावातील समस्या सोडवण्यासाठी तुझी गरज गावात आहे, हे बाबा आमटे यांचे शब्द त्यांच्या जीवनाला दिशा देणारे ठरले.

श्रमसंस्कार शिबिर समन्वयक म्हणून काम, साहस सहली, पंजाब एकता अभियान, भारत जोडो सायकल यात्रा,या साऱ्या अनुभवांतून सामाजिक कार्याची प्रेरणा त्यांच्या रोमरोमात भिनली.

कमवा आणि शिका योजनेत काम करत असता नाही ते वर्गात नेहमी अव्वल राहिले आणि बी.कॉम. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पुढे महाविद्यालयात कार्यालयीन पद मिळाले. नोकरी सांभाळत असतानाच राष्ट्रसेवा दल, छात्र भारती, समाजभारती, राष्ट्रीय युवा योजना, जिल्हा साक्षरता अभियान, व्यसनमुक्ती, रक्तदान व अवयवदान चळवळींत त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

याच काळात लातूर येथे रोटरी क्लबच्या वतीने डॉ. नरेंद्र दाभोळकर यांचे तीन दिवसांचे शिबिर आयोजित झाले. वैज्ञानिक दृष्टिकोनातून अंधश्रद्धा निर्मूलनाचे जे धडे दाभोळकरांनी दिले, त्यांचा माधव बावगे यांच्यावर खोलवर परिणाम झाला.

लहानपणापासून अंधश्रद्धेने पोखरलेला समाज पाहिल्याने त्यांच्या मनातील संघर्षाला स्पष्ट दिशा मिळाली. सत्य काय आणि आपण कोणत्या अज्ञानात जगतो? या प्रश्नाने त्यांना ग्रासले आणि त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यात स्वतःला झोकून दिले.

या चळवळीतून २५०० हून अधिक व्याख्याने, ७००हून अधिक करणी,भानामती प्रकरणांचे निरसन, ३६० आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह सत्यशोधकी पद्धतीने, ३ नरबळी प्रकरणे व ५ पशुहत्यांचे प्रयत्न थांबवणे, १२ पोतराजांना प्रथेतून मुक्त करणे, राज्य व जिल्हास्तरावर २६ मोहिमा आणि ४० परिषदांचे आयोजन,असे प्रचंड कार्य उभे राहिले. हे काम अनेक विवेकवादी कार्यकर्त्यांच्या सहभागातून शक्य झाले, असे ते नम्रपणे सांगतात.

डॉ. दाभोळकर यांच्या हत्येनंतर सुरू झालेल्या हिंसक विरोधाच्या काळात आम्ही सारे दाभोळकर या भावनेतून जुने-नवे कार्यकर्ते अधिक एकत्र आले. धमक्या, हल्ले, पोलीस ठाण्यातील नजरकैद, पेट्रोल टाकून जाळण्याचे प्रयत्न, गोळ्या झाडण्याच्या धमक्या, हे सर्व सहन करूनही ते डगमगले नाहीत.

१९९३ पासून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीत सक्रिय राहून त्यांनी २०२२-२५ या काळात राज्य कार्याध्यक्ष आणि सध्या राज्य अध्यक्ष म्हणून जबाबदारी स्वीकारली आहे. डॉ. दाभोळकरांच्या काळातील १८० शाखा आज ३५० हून अधिक झाल्या आहेत.

भारत सरकारचा राष्ट्रीय युवा पुरस्कार, महाराष्ट्र फाउंडेशन अमेरिका सामाजिक प्रबोधन पुरस्कार, डॉ. राम आपटे प्रबोधन पुरस्कार, शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर पुरस्कार, शाहू भूषण पुरस्कार आणि आता बाबा आमटे राष्ट्रीय सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार २०२६, अशा अनेक सन्मानांनी त्यांचे कार्य गौरवले गेले आहे.

तरुण आणि महिलांची विवेकाधारित संख्या वाढवणे, अध्यात्मिक बुवाबाजीला रोखणे, मूल्यपरिवर्तन घडवणे आणि जादूटोना विरोधी कायदा केंद्रात मंजूर करवून घेणे, ही त्यांची पुढील पंधरा वर्षांची ध्येये आहेत.

सत्य, विवेकबुद्धी आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या मार्गावर समाजाला कलंक ठरणाऱ्या अंधश्रद्धेच्या जाळ्यातून मुक्त करण्याच्या या प्रवासात त्यांना अखंड यश लाभो,याच मनःपूर्वक शुभेच्छा.

----------------

**माधव बावगे संपर्क क्रमांक**
**9422469564**

(कालच्या अंकावरून पुढे)

# राष्ट्रवादी (शप) ची निराशाजनक कामगिरी!

अभय गोखले

शरद पवार हे प्रचारात सहभागी झालेच नाहीत. सुप्रिया सुळे या शेवटच्या टप्प्यात प्रचारात सहभागी झाल्या. त्यामुळे प्रचाराची सारी धुरा अजित पवार यांना सांभाळावी लागली.

आपल्या प्रचार सभांमध्ये अजित पवार यांनी भाजपावर भ्रष्टाचाराचे आरोप केले. मात्र ज्यांच्यावर सत्तर हजार कोटी रुपयांचा सिंचन घोटाळ्याचा आरोप आहे, त्या अजित पवारांनी इतरांवर भ्रष्टाचाराचे आरोप करणे? मतदारांना रूचले नसावे. प्रचारात भाजपावर भ्रष्टाचाराचे आरोप करणारे अजित पवार हे निवडणुक संपल्यानंतर पुन्हा भाजपा बरोबर सरकारमध्ये दिसणार आहेत, ही गोष्ट मतदारांना माहित असल्याने, त्यांनी अजित पवार यांच्या पक्षाला मतदान करताना हात आखडता घेतला असावा.

पुणे महानगरपालिकेतही भाजपाला हरवण्यासाठी अजित पवार आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील पक्ष एकत्र आले होते. तेथेही अजित पवार यांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावली होती. मात्र भाजपाने पुणे महानगरपालिकेच्या एकूण १६५ जागांपैकी ११९ जागांवर दणदणीत विजय मिळवून राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांना चारीमुंड्या चीत केले. गेल्या खेपेस राष्ट्रवादीला ४३ जागा मिळाल्या होत्या. याखेपेस दोन्ही गट एकत्र येऊनही राष्ट्रवादीला फक्त २७ जागाच जिंकता आल्या.

राष्ट्रवादी (शप) ला फक्त तीन जागांवर विजय मिळाला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे पुणे, पिंपरी चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, सांगली आणि इचलकरंजी या आपल्या बालेकिल्ल्यांतील महानगर पालिकांमधील ६११ जागांपैकी फक्त ११९ जागा राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांना जिंकता आल्या. २९ महापालिकांमधील एकूण २८६९ जागांपैकी भाजपाला सर्वात जास्त म्हणजे १४२५ जागा मिळत असताना, अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीला केवळ १६७ जागांवर विजय मिळाला आहे, तर शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीला फक्त ३६ जागांवर विजय मिळाला असून पक्षाची पुरती धुळधाण उडाली आहे.

राष्ट्रवादी (शप) ची ही निराशाजनक कामगिरी,पक्षाच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. पक्षाचे सर्वोच्च नेते शरद पवार हे वयोमानामुळे पुर्वीसारखे सक्रिय राहिलेले नाहीत. तसेच अजित पवार यांनी वेगळी चूल मांडल्यानंतर, पक्षाचे बरेच अनुभवी नेते अजित पवार यांच्या गटात गेले आहेत.

नजिकच्या भविष्यात पक्षाचे बरेच नेते आणि कार्यकर्ते, इतर पक्षांत गेले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. आपले अस्तित्व टिकवायचे असेल तर शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील गटाने, अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गटात प्रवेश करणे,हा त्यावरील उत्तम तोडगा असू शकतो.ती प्रक्रिया कदाचित जिल्हापरिषद निवडणुकीनंतर सुरू होईल अशी शक्यता सध्या तरी दिसत आहे.

■ ■ ■

## वाचक लिहितात

### प्रजासत्ताक दिन : कर्तव्यांचे आत्मचिंतन...

येत्या काही दिवसांत आपण प्रजासत्ताक दिन साजरा करणार आहोत. २६ जानेवारी १९५० रोजी आपल्या देशात संविधान लागू झाले. लोकशाही, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही संविधानाची मूलभूत तत्त्वे आहेत. संविधानाने दिलेले अधिकार उपभोगताना त्या अधिकारांशी निगडित कर्तव्यांप्रती आपण किती जागरूक आहोत, याचे आत्मचिंतन करण्याचा हा दिवस आहे.

आपण एक सुज्ञ नागरिक म्हणून आपल्या कर्तव्यांप्रती किती सजग आहोत? संविधानाने जसे आपल्याला मूलभूत अधिकार दिले आहेत, तसेच काही मूलभूत कर्तव्येही दिली आहेत. त्यामध्ये मतदान करणे, कायद्याचे पालन करणे, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे, सामाजिक सौहार्द जपणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि देशहिताला प्राधान्य देणे यांचा समावेश आहे. या प्रत्येक कर्तव्याचे आपण कितपत प्रामाणिकपणे पालन करतो, याचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

सरकारी तसेच खाजगी क्षेत्रात भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात फोफावलेला आहे. लाच देणे-घेणे, कर न भरणे, सार्वजनिक मालमत्तेचा दुरुपयोग करणे, सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरवणे, कायद्याचे पालन न करणे, मतदानाबाबत उदासीनता दाखवणे, तसेच रहदारीच्या नियमांकडे दुर्लक्ष करणे,या सर्व समस्या समाजात ठळकपणे दिसून येतात. पण या सगळ्यांसाठी केवळ सरकारच जबाबदार आहे का? निश्चितच नाही. या समस्यांना आपण सर्व नागरिकदेखील तितकेच जबाबदार आहोत.

■ सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा.

### मनपाला विनंती

काही दिवसांतच रथसप्तमी तसेच २६ जानेवारी (प्रजासत्ताक दिन) साजरा होणार असून त्या अनुषंगाने शाळा, महाविद्यालये तसेच विविध संस्थांमध्ये प्रात्यक्षिक सरावाला सुरुवात झालेली आहे. रथसप्तमी निमित्त अनेक योगप्रेमी पहाटे सूर्यनमस्कारासाठी एकत्र येतात. तसेच प्रजासत्ताक दिनानिमित्त ड्रिल सराव सुरू आहे. यासाठी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, सायकलस्वार तसेच पायी जाणारे नागरिक पहाटेच्या वेळेत घरा बाहेत पडतात. मात्र त्यावेळी मुख्य मार्ग सोडल्यास सगळी कडील पथदिवे बंद झालेले असतात. जवळजवळ सव्वा सहा साडे सहा वाजेपर्यंत सर्वत्र अंधार असतो.

त्याच वेळी भटक्या कुत्र्यांची टोळकी सावजाच्या शोधत असतात, यामुळे अपघात होण्याची शक्यता असते. तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. यामुळे मनपाला नम्र विनंती आहे की, ऋतूनुसार आणि परिस्थितीनुसार पथदिवे सुरू-बंद करण्याचे नियोजन करण्यात यावे. काही दिवसांनंतर दिवस लवकर उजाडू लागेल, त्या वेळी वेळापत्रकात आवश्यक ते बदल करता येतील.

मात्र सध्याच्या काळात योग्य नियोजन केल्यास नागरिकांची आणि विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही तसेच सुरक्षितता अबाधित राहील. मनपाने या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने योग्य ते उपाय करावे अशी नम्र विनंती.

■ सौ. प्रांजली विजय ब्रम्हे
नागपूर.

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### तुम मुझे..!

तुम मुझे खुन दो
मै तुम्हे आझादी दुंगा
असे आवाहन करताच
युवकांची
आझाद हिंद सेना
झाली लढण्या तय्यार !

आज तुम मुझे व्होट दो
मै तुम्हे सब मोफत दुंगा
असे म्हणून जनतेला
दिशाहीन नेताजी कां
बनवत आहे
आळसी षंढ लाचार ..?

# अस्मिता

## चित्रपटनिर्मितीतली ज्योती

**१९९३ मध्ये एमबीए पूर्ण झाल्यानंतर ज्योती देशपांडे यांनी मिनदशरे मीडिया या युके आधारित कंपनीत वरिष्ठ सल्लागार म्हणून काम सुरू केले. त्यानंतर त्या झी नेटवर्क मध्ये विक्री व विपणन प्रमुख झाल्या. झीमध्ये काम केल्यानंतर त्यांनी काही काळ जेम्स वॉल्टर थॉंप्सन या जाहिरात संस्थेतही काम केले. सध्या त्या चित्रपटनिर्मात्या तर आहेतच त्याशिवाय त्या जिओ स्टुडिओच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत.**

ज्योती देशपांडे या आजच्या काळातील विशेषतः मराठी आणि हिंदी सिनेमा क्षेत्रात अतिशय प्रभावी आणि यशस्वी चित्रपट निर्मात्या म्हणून ओळखल्या जातात. ज्योती देशपांडे मूळच्या मुंबईच्या. त्यांनी नरसी मोनजी कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स मधून वाणिज्य व अर्थशास्त्र विषयात पदवी मिळवली. १९९३ मध्ये एमबीए पूर्ण झाल्यानंतर ज्योती देशपांडे यांनी मिनदशरे मीडिया या युके आधारित कंपनीत वरिष्ठ सल्लागार म्हणून काम सुरू केले. त्यानंतर त्या झी नेटवर्क मध्ये विक्री व विपणन प्रमुख झाल्या. झीमध्ये काम केल्यानंतर त्यांनी काही काळ जेम्स वॉल्टर थॉंप्सन या जाहिरात संस्थेतही काम केले. सध्या त्या चित्रपटनिर्मात्या तर आहेतच त्याशिवाय त्या जिओ स्टुडिओच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. या भूमिकेत त्या हिंदी, मराठी, तमिळ, तेलुगू अशा विविध भाषांतील चित्रपट आणि वेब-कंटेंटचे नियोजन, निवड आणि निर्मिती पाहतात.

भारतातील मोठ्या बॅनरपैकी एक असलेल्या जिओ स्टुडिओसाठी त्या निर्णायक भूमिका बजावत आहेत. मराठी चित्रपटसृष्टीतदेखील त्यांनी धाडसी, वेगळ्या विषयांवर आधारित आणि दर्जेदार चित्रपट प्रेक्षकांसमोर आणले. मनोरंजनासोबतच सामाजिक आशय, माणसांचे भावविश्व आणि वास्तव मांडणारे चित्रपट त्यांनी नेहमीच प्राधान्याने निवडले. 'धुरंधर' या चित्रपटाच्या निर्मितीतही त्यांचा सहभाग आहे. हा चित्रपट विषय, मांडणी आणि कलाकारांच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो. केवळ मोठी नावे नव्हे,तर कथेची ताकद पाहून त्या निर्णय घेतात. मराठी सिनेमाला राष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ मिळवून देणे,नव्या दिग्दर्शकांना आणि लेखकांना संधी देणे आणि महिला निर्मात्यांचे नेतृत्व मजबूत करणे यासाठी ज्योती देशपांडे यांचे योगदान महत्वाचे मानले जाते. किल्ला, सायकल, झिम्मा२, सुमी, संगीत मानापमान यासारखे मराठी चित्रपट तर शैतान, स्त्री२, आर्टिकल३७०, भेडिया यासारख्या गाजलेल्या हिंदी चित्रपटाच्या निर्मितीत त्यांचा सहभाग आहे. त्यांनी निर्मित केलेल्या अनेक चित्रपटांचा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांत गौरव झाला आहे. वैयक्तिक पातळीवरही त्यांनी मीडिया व एंटरटेनमेंट क्षेत्रातील प्रभावी महिला म्हणून मान्यता मिळवली आहे. थोडक्यात, ज्योती देशपांडे या आज मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील कंटेंटवर विश्वास ठेवणाऱ्या, दूरदृष्टी असलेल्या आणि प्रत्यक्ष काम करणाऱ्या निर्मात्या आहेत.

मानिनी



## व्हॉईस टायपिंग

आज मोबाईल हे केवळ बोलण्यासाठीचे साधन राहिले नाही, तर मोबाईल आपल्या दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा भाग बनला आहे. संदेश पाठवणे, नोंदी लिहिणे, यादी तयार करणे, माहिती शोधणे अशी अनेक कामे मोबाईलवर करावी लागतात. अशा वेळी मोबाईलमध्ये उपलब्ध असलेली बोलून लिहिण्याची सुविधा फारच उपयोगी ठरते.हाताने लिहिताना किंवा टाईप करताना वेळ लागतो. बोटे दुखतात. डोळ्यांवर ताण येतो. कधी कधी अक्षरे चुकतात. अशा वेळी बोलून लिहिले तर काम सोपे, जलद आणि आरामदायक होते. खरे म्हणजे मोबाईलमध्ये ही सोय आधीपासूनच असते. पण कितीतरी महिलांना त्याची माहिती नसते. आपण बोलतो तसे मोबाईल आपोआप लिहितो. त्यासाठी मोबाईलच्या कीबोर्डवरील मायक्रोफोन चिन्हावर स्पर्श केला, की त्याचे काम सुरू होते. मात्र या मायक्रोफोनवर स्पष्ट आवाजात बोलावे लागते. घरकाम करणाऱ्या, नोकरी करणाऱ्या, शिक्षण घेणाऱ्या, तसेच वयस्कर महिलांसाठी ही सुविधा तितकीच उपयोगाची आहे. व्हॉईस टायपिंगमुळे वेळ वाचतो. लांब संदेश, आठवणी, कामांची यादी, औषधांची नावे किंवा मनात आलेले विचार लगेच बोलून लिहिता येतात. त्यामुळे लिहिण्याची भीती कमी होते आणि मोबाईल वापरण्याचा आत्मविश्वास वाढतो. ज्यांना टाईपिंगचा सराव नाही अशा महिलांनाही ही सुविधा सहज वापरता येते. बोलून लिहिताना शांत ठिकाणी, हळू आणि स्पष्ट बोलणे महत्त्वाचे असते. लिहिलेला मजकूर एकदा पाहून घ्यावा, म्हणजे त्यात झालेली चूक लगेच दुरुस्त करता येते. रोज थोडा सराव केल्यास मोबाईल आपला आवाज अधिक चांगल्या प्रकारे ओळखू लागतो आणि लिहिणे अधिक अचूक होते. ही सुविधा केवळ सोयीसाठी नव्हे, तर महिलांच्या स्वावलंबनासाठीही महत्त्वाची आहे. हे तंत्रज्ञान अवघड नाही. बोलून लिहिणे सर्वांसाठी सहज, सोपे आणि उपयुक्त ठरते. योग्य पद्धतीने वापरले तर ते आपले काम हलके करते. प्रत्येक महिलेने ही सुविधा वापरून पाहावी, कारण तंत्रज्ञान आपल्यासाठी आणि आपल्या मदतीसाठी आहे.

टेक्नो टिप्स



## वरईचा ढोकळा



उपवास म्हटला की साबुदाणा खिचडी, भगर आमटी, उपवासाची बटाटा भाजी असे मोजकेच पदार्थ केले जातात. मात्र उपवासाच्या पदार्थांमध्येही बरीच विविधता पहायला मिळते. उपवासाला तुम्ही छान चविष्ट आणि पौष्टिक पदार्थ खाऊ शकता. आज आपण वरईच्या ढोकळ्याची रेसिपी जाणून घेऊ.

**साहित्य:** एक कप वरई, अर्धा कप दही, अर्धा कप पाणी, चार ते पाच हिरव्या मिरच्या, दोन लाल मिरच्या, एक चमचा शेंगदाणा तेल, अर्धा चमचा साखर, लिंबाचा रस, चिमूटभर बेकिंग सोडा, कोथिंबिर, मीठ आणि जीरं

**कृती :** दह्यात पाणी मिसळून घ्या. यात वरई घालून सहा ते आठ तास भिजवून ठेवा. वरई रात्रभर भिजवून ठेवता येईल. वरई फुलल्यावर मिक्सरमध्ये वाटून घ्या. यात मीठ आणि बेकिंग सोडा घाला. बेकिंग सोडा मिश्रणात नीट मिसळून घ्या. आता एका खोलगट भांड्याच्या तळाला तेल लावून घ्या. हा ढोकळा मायक्रोवेव्हमध्येही करता येईल. त्यासाठी मायक्रोवेव्ह सेफ बाऊल घ्या. भांड्यात वरईचं मिश्रण घाला. कूकरमध्ये ढोकळा करणार असाल तर तळाशी थोडं पाणी घालून त्यावर स्टँड ठेवा. मग भांडं ठेवा. शिटी आणि रिंग काढून टाका. झाकण लावा. १५ ते २० मिनिटं वाफवून घ्या. मायक्रोवेव्हमध्ये योग्य तापमानावर सेटिंग करून घ्या. वाफवून झाल्यावर चमचा किंवा सुरीने ढोकळा शिजल्याची खात्री करून घ्या. आता तडका करायचा आहे. यासाठी तडका पॅन किंवा कढईत तेल घ्या. गरम झाल्यावर जिरं घाला. मग हिरवी आणि लाल मिरची घाला. हा तडका ढोकळ्यावर घाला. वरून कोथिंबिर भुरभुरा. चटणीसोबत खा. झटपट होणारा हा ढोकळा तुम्हाला नक्कीच आवडेल.

रसगंधा

## आकर्षक केशरचनेसाठी...

सणवार किंवा लग्नसमारंभ म्हटला की आपल्यास उत्साह संचारतो. अगदी कपड्यांपासून मेकअपच्या सामानापर्यंत भरपूर खरेदी केली जाते. तयारीची लगबग सुरू होते. आपल्या व्यक्तिमत्त्वाला साजेशा केशरचना केल्या जातात. खास प्रसंगी तुमचे केस किंवा केशरचना सुंदर दिसण्यासाठी काय करता येईल याविषयी...



✽ सण किंवा समारंभाच्या एक किंवा दोन दिवस आधी स्कॅल्प तसंच केसांना गरम तेलाने मालीश करा. यानंतर गरम तेलात भिजवलेला टॉवेल केसांवर बांधा. यामुळे केसांचं कंडिशनिंग तर होईलच शिवाय कोरडेपणाही दूर होईल. दुसऱ्या दिवशी शँपूने केस धुवून टाका.

✽ तुमचे केस खूप गुंतलेले किंवा कोरडे असतील तर आदल्या रात्री दही लावून ठेवा. साधारण २० मिनिटांनी धुवून टाका. दुसऱ्या दिवशी केस धुवा. यामुळे केसांना पोषण आणि हटके लूक मिळेल.

✽ केशरचना करण्याआधी केस स्वच्छ धुवून घ्या. तसंच केसांना सीरम लावायला विसरू नका. सीरममुळे केसांचं रक्षण होईल.

✽ केसांना व्हॉल्यूम देण्यासाठी स्टायलिंग क्रीम वापरता येईल. क्रीम लावल्यानंतर काही काळाने केस ब्रशने सेट करता येतील. केसांना टेक्स्चर क्रीम लावता येईल. यामुळे केस चमकदार आणि मुलायम दिसतील.

✽ तुम्ही घरीच केसांना आयर्निंग करणार असाल तर आधी प्रोटेक्टिंग स्प्रे फवारा.

✽ हेअरस्टाईल करण्याआधी केस शँपूने नीट धुवा. केसांमध्ये थोडंही तेल राहता कामा नये. अन्यथा, केस नीट बसणार नाहीत.

✽ वय, पोशाख आणि चेहऱ्याच्या आकारानुसार हेअरस्टाईलची निवड करा.

✽ केशरचना करताना भरपूर अॅक्सेसरीजचा वापर करू नका. कमीत कमी अॅक्सेसरीजमध्ये क्लासी लूक मिळवा.

✽ छोट्या केसांना फार तेल किंवा जेल लावू नका.

ब्युटी टॉक

## कसं असावं सॅलड?



आपल्या आहारात सॅलडचा समावेश असतो. जेवणासोबत किंवा एक वेळचं खाणं म्हणून सॅलड खाल्लं जातं. कांदा, टोमॅटो, काकडी, बीटसोबतच इतर काही भाज्या किंवा पदार्थांचा समावेश सॅलडमध्ये केला जातो. मात्र भाज्या किंवा पदार्थ कच्चे खाल्ल्यास तुम्हाला त्रास होऊ शकतो. तसंच सॅलड बनवताना घातल्या जाणाऱ्या काही पदार्थांमुळे वजनही वाढू शकतं. स्टार्चचं प्रमाण अधिक असणाऱ्या भाज्या कच्च्या खाऊ नयेत. सॅलड बनवताना नेमकी कोणती काळजी घ्यावी याविषयी...

✽ कॉर्न किंवा मक्याच्या दाण्यांमध्ये स्टार्चचं प्रमाण अधिक असतं. अनेक जण उकडलेला मका खातात. मात्र मक्याचे दाणे सॅलड म्हणून खाणं घातक ठरू शकतं. यामुळे तुमच्या पचनसंस्थेवर परिणाम होऊ शकतो. मक्यांऐवजी गाजर आणि मुळा खाता येईल.

✽ सॅलडमध्ये उकडलेला पास्ता घातला जातो. मात्र हे सॅलड अधिक प्रमाणात खाऊ नये. मैद्याचा पास्ता आरोग्यासाठी चांगला नसतो. पास्तामुळे रक्तातलं साखरेचं प्रमाण वाढू शकतं. पास्ता सॅलडमुळे कोलेस्टरॉलही वाढू शकतं.

✽ तळलेला कांदा, तळलेली भेंडी तुमचं आहारतंत्र बिघडवू शकते. यात कॅलरींचं प्रमाण अधिक असतं. तळकट पदार्थ खाण्याऐवजी ब्रोकोली, पालक तसंच इतर काही हिरव्या भाज्यांचा समावेश जेवणामध्ये करता येईल.

✽ आक्रोड, काजू सॅलड म्हणून खाण्याऐवजी उकडलेले छोले किंवा शेंगदाणे खाता येतील.

✽ सॅलडमध्ये तळलेला ब्रेड घालण्यापेक्षा बदाम घालता येतील. सॅलडमधून फॅट्स मिळवण्यासाठी पनीरही घालता येईल.

डाएट मंत्रा

## मस्त हँडलूम साड्या



सणावारी हटके दिसण्यासाठी यंदा हँडलूम साडी खरेदी करता येईल. पटोला, इक्कत, कुनबी, कांजीवरम, पैठणी अशा साड्या तुम्हाला वेगळा लूक देतील. यंदा सणांना पारंपरिक लूक करायचा असेल तर तुम्ही अशाच काही ट्रेंडी साड्या निवडू शकता. या साड्यांसोबत कॉन्ट्रास्ट किंवा मॅचिंग ब्लाउज घालता येतील. बॉलिवूड सेलेब्जही हँडलूम साड्यांना पसंती देतात. त्यांच्याकडूनही काही टिप्स मिळू शकतील!

✽ विद्या बालनने एका चित्रपटाच्या ई प्रमोशन दरम्यान बऱ्याच हँडलूम साड्या घातल्या होत्या. विद्याची रंगीबेरंगी चेक्स साडी आकर्षणाचा विषय ठरली. भागरपूरची लिनन साडीही सुंदर होती.

✽ पद्मश्री पुरस्कार स्वीकारायला आलेल्या प्रियांका चोप्राने पारंपरिक पेहरावाला प्राधान्य दिलं होतं. तिने छानशी साडी नेसली होती. प्रियांकाने जामदनी साडीची निवड केली होती. तुम्हीही अशी साडी घेऊ शकता.

✽ दिया मिर्झालाही हँडलूम साड्या खूप आवडतात. ती बरेचदा हँडलूम सिल्क तसंच कॉटन साड्यांमध्ये दिसते. हँडलूम शिफॉन साड्याही तिच्या वॉर्डरोबचा भाग बनल्या आहेत.

✽ अॅक्रोमॅटिक माकू हँडलूम साडीही तुम्हाला वेगळा लूक देईल. या साडीमुळे तुमचं वेगळेपण उठून दिसेल. अनुष्का शर्माने अशी साडी नेसली होती.

✽ यासोबतच आपली पैठणीही आहेच. हँडलूम पैठणीचा थाटच निराळा असतो. ही पैठणी नेसल्यावर सगळ्यांचं लक्ष तुमच्यावरच खिळून राहतं.

त्यामुळे आता हँडलूम साडी खरेदी करायला हरकत नाही. हँडलूम साड्या थोड्या महाग असल्या तरी अशी एखाद-दुसरी साडी विकत घेता येऊ शकते.

स्टाईल स्टेटमेंट

## अचानक वाहन बंद पडले तर...

रस्ता नेहमीचाच. पण अचानक गाडी थांबते. इंजिनचा आवाज बंद होतो. टू व्हीलर असेल तर अनेकदा किक मारून होते आणि कार असेल तर इग्निशन फिरवून होते. पण गाडी स्टार्टच होत नाही. आधी चिडचिड होते. काही सेकंद डोके सुन्न होते. आता उशीर होईल कुणाला फोन करू? अशा विचारांनी मन भरून जाते. पण अशा वेळी शांत राहून निर्णय घेणे महत्त्वाचे असते.



घाबरून गाडीतून लगेच बाहेर पडू नका. गाडी शक्य तितकी बाजूला घ्या आणि हॅझर्ड लाईट सुरू करा. आधी आजूबाजूला पाहा. वस्ती आहे का? पेट्रोल पंप किती लांब आहे? रस्ता गजबजलेला आहे की सुनसान?

यानंतर मोबाईलचा स्मार्ट वापर करा. गूगल मॅपवर तुमचे लोकेशन तपासा. नेटवर्क नसले तरी ऑफलाईन मॅप उपयोगी पडतो. तुमच्या वाहन कंपनीची रोडसाईड असिस्टंसची सोय असेल तर त्यातून थेट मदत मागता येते. काही अॅप्समध्ये एकाच क्लिकवर लोकेशन पाठवता येते. त्यामुळे परिस्थिती समजावून सांगायची घाई राहत नाही. अशा प्रसंगी सुरक्षिततेसाठी ट्रू कॉलर किंवा त्यासारखे अॅप उपयोगी ठरतात. अनोळखी कॉल आला तर नंबर ओळखता येतो. एसओएस किंवा इमर्जन्सी अॅप्समध्ये आधीच विश्वासू व्यक्तींचे नंबर सेव्ह करून ठेवल्यास एका बटणावर त्यांना तुमचे लोकेशन जाते. मदत स्वीकारताना भावनेवर नव्हे तर शहाणपणावर विश्वास ठेवा. कुणी अनोळखी मदतीला आले तर पूर्ण गाडीतून बाहेर उतरायची गरज नाही. काच थोडीशी खाली करून बोला. मी आधी हेल्पलाइनला कॉल करते असे ठामपणे सांगायला संकोच करू नका. हा कठोर वाटणारा निर्णयच तुम्हाला सुरक्षित ठेवतो. मात्र फोन चार्ज असणे, पॉवर बँक जवळ ठेवणे, गाडीचे कागद मोबाईलमध्ये स्कॅन करून ठेवणे, आणि आवश्यक अॅप्स आधीच इन्स्टॉल करून ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. शांत मनाने उपलब्ध साधनांचा योग्य वापर करून घेतलेला निर्णय अधिक सक्षम आणि आत्मविश्वासपूर्ण बनवतो.

बी प्रॅक्टिकल

## कारणं कंबरदुखीची

अनेकांना कंबरदुखीचा त्रास होतो. सततच्या कामामुळे आणि वाकल्यामुळे महिलांची कंबर जास्तच दुखते. कंबर दुखण्याची बरीच कारणं आहेत. कंबरदुखीच्या कारणांचा हा वेध...

✽ स्नायू ताणले जाणं ही अगदी सर्वसामान्य समस्या आहे. खेळताना किंवा दैनंदिन कामं करताना एखादा स्नायू खेचला जातो. कंबरेलगतचा स्नायू खेचला गेल्यास त्रास होऊ शकतो. तुमचे स्नायू सतत आखडत असतील आणि यामुळे वारंवार कंबरदुखी उद्भवत असेल तर डॉक्टरांचा सल्ला घेणं आवश्यक आहे.

✽ बराच काळ बसल्यानंतर पटकन उठल्यास कंबरेला त्रास होऊ शकतो. तुमचे स्नायू वारंवार ताणले जात असतील तर उठता-बसताना विशेष काळजी घ्या.

✽ वयाची ४५ वर्षं उलटल्यानंतर स्नायू कमकुवत होऊ लागतात. त्यामुळे कंबरदुखीची समस्या उद्भवू शकते. कंबरेचे स्नायू कमकुवत झाल्यावर दुखू लागतात आणि तुम्हाला त्रास होतो.

✽ स्नायूंच्या बळकटीसाठी काही उपाय करता येतील. नियमित व्यायामामुळे स्नायूंना बळकटी मिळू शकते. स्नायूंना बळकटी देणारे व्यायाम करा. अर्थात स्नायूंना बळकटी देण्याआधी फिजिओथेरपिस्टचा सल्ला घ्या.


✽ झोपण्याच्या, बसण्याच्या चुकीच्या पद्धतीमुळे असं होऊ शकतं. ऑफिसमध्ये बैठं काम करणाऱ्यांना ही समस्या अधिक सतावते. त्यामुळे खुर्चीवर बसून काम करताना नेमकी कोणती काळजी घ्यावी, कसं बसावं या बाबी जाणून घ्या.

✽ कंबर दुखत असेल तर कुशीवर झोपा. कंबर सरळ असेल तर शरीराला जास्त आराम मिळतो. कुशीवर झोपायचं असेल तर गुडघ्याखाली उशी ठेऊन झोपा.

✽ हाडं कमकुवत असतील तर कंबर दुखू शकते. कंबरेत अचानक वेदना जाणवत असतील तर तुम्हाला त्रास होऊ शकतो. यामुळे पाठीच्या कण्याचं नुकसान होऊ शकतं.

✽ जखमा झाल्यामुळेही कंबर दुखू शकते. थंडीत स्नायू आखडल्यामुळेही कंबर दुखू शकते.

आरोग्यवेध



स्कीन केअर


### अॅव्हॉकाडो फेस पॅक



चिरतरुण रहावं, नेहमी सुंदर दिसावं असं कोणाला वाटत नाही? पण त्वचेवर वाढत्या वयाच्या खुणा दिसू लागतात. तुम्हालाही बराच काळ तरुण दिसायचं असेल तर आठवड्यातून एकदा अॅव्हॉकाडोचा फेस पॅक लावा. मुरुमं कमी व्हायला मदत होईल. यासाठी दोन चमचे अॅव्हॉकाडोचा गर आणि दोन चमचे कोरफडीचा गर घ्या. हे दोन्ही घटक मिसळून घ्या. चेहऱ्याला लावा. २० मिनिटांनी धुवून टाका. या पॅकमुळे चेहऱ्याला ओलावा आणि पोषण मिळेल. अॅव्हॉकाडोमध्ये आरोग्यदायी फॅट्स असतात. यासोबतच यातली जीवनसत्त्वं, खनिजं आणि इतर पोषक घटक त्वचेला नवतजेला प्रदान करतात. यामुळे तुम्ही बराच काळ तरुण दिसू शकता.

स्मार्ट टिप्स

### देखभाल दागिन्यांची



दागिन्यांची चमक टिकवून ठेवण्यासाठी थोडी काळजी घ्यावी लागेल. तुमचे दागिने क्लोरिनयुक्त पाण्यापासून लांब ठेवा. आंघोळ करताना दागिने काढून ठेवा. क्लोरिनमुळे सोन्याचांदीचे दागिनेही काळे पडतात. ऑक्सडाईज्ड दागिने पाण्यापासून लांबच ठेवा. दागिने कितीही साधे किंवा स्वस्त असले तरी योग्य देखभाल केल्यास ते बरीच वर्षं टिकू शकतात. चांदीचे दागिने टूथपेस्टने चमकवता येतील. कोमट पाण्यात थोडा साबण घालून दागिने स्वच्छ करता येतील. दागिने अगदी हलक्या हातांनी स्वच्छ करा. मेक अप केल्यानंतर दागिने घाला. मेक अपमधल्या घातक रसायनांमुळे दागिने खराब होऊ शकतात, हे लक्षात असू द्या.

किचन टिप्स

### हा आहे फरक...



बेकिंग सोडा आणि बेकिंग पावडर हे शब्द तुम्ही ऐकले असतील. ढोकळा, केक तसंच बेकिंग प्रोडक्ट्स तयार करण्यासाठी या दोन घटकांचा वापर केला जातो. मात्र या दोहोंमध्ये काही फरक आहे का, असा प्रश्न आपल्याला पडत असतो. बेकिंग सोडा किंवा पावडर घातल्यानंतर पदार्थाला छान जाळीदार आणि फुगीर टेक्स्चर मिळतं. बेकिंग सोडा म्हणजे सोडियम बायकार्बोनेट. लिंबाचा रस किंवा आंबट पदार्थ घातल्यास बेकिंग सोडा फसफसतो. बेकिंग पावडरमध्ये बेकिंग सोडा हाच प्रमुख घटक असतो. यासोबतच एक अॅसिडिक मीडियम आणि कॉर्नस्टार्चही असतं. याच घटकांमुळे बेकिंग पावडर बेकिंग सोड्यापेक्षा वेगळी ठरते.

# महापौर पदासाठी आरक्षण फिक्सिंग?

## विजय वडेट्टीवारांचा आरोप

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २२ :**



नागपुरातील महापौर पदासाठी आरक्षणात घोळ घालण्यात आल्याचा गंभीर आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. नागपूरमध्ये सर्वसाधारण महिला आरक्षण लागू होत असतानाच भाजपने आधीच आपली उमेदवार निश्चित केल्याचा दावा त्यांनी केला. भाजपकडून शिवानी दानी या महापौर पदाच्या उमेदवार असणार असल्याचे नावही वडेट्टीवार यांनी जाहीर केले.

विजय वडेट्टीवार म्हणाले की, हे आरक्षण फिक्सिंग आहे, असे मी काही दिवसांपूर्वीच सांगितले होते. नागपुरात महापौर पदाचा उमेदवार आधीच ठरवण्यात आला असून आज मी त्यांचे नाव जाहीर करतो. शिवानी दानी या भाजपच्या महापौर पदाच्या उमेदवार असतील,असा घणाघाती आरोप वडेट्टीवार यांनी केला.

आरक्षण प्रक्रियेत सुरू असलेल्या कथित गोंधळावर बोलताना विजय वडेट्टीवार यांनी शिवसेनेच्या भूमिकेचे समर्थन केले. आरक्षणावर शिवसेनेने घेतलेले आक्षेप पूर्णपणे योग्य आहेत. गरज भासल्यास हे प्रकरण न्यायालयात जाण्याचीही शक्यता आहे, असेही वडेट्टीवार म्हणाले. नागपुरातील महापौर पदाच्या निवडीवरून आता राजकीय वाद आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

भाजपला १०२ जागांवर मिळवला विजय नागपूर महानगरपालिकेसाठी १५ जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडली होती, तर १६ जानेवारीला निकाल जाहीर झाला. एकूण १५१ जागांसाठी झालेल्या या निवडणुकीत भाजपने मोठे यश मिळवत १०२ जागांवर विजय मिळवला आणि सर्वात मोठा पक्ष ठरला.

चंद्रपूर येथील काँग्रेसमधील अंतर्गत वादावर भाष्य करण्याचे विजय वडेट्टीवार यांनी टाळले असले तरी, वाद कायम असल्याचे अप्रत्यक्ष दिसून आले.

# १५ वर्षापासून नागपूर मनपावर भाजपची एकहाती सत्ता

## यावेळी महापौर सर्वसाधारण गटातून : शिवानी दाणी प्रबळ दावेदार

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २२ :**

राज्याचे उपराजधानीचे शहर नागपूर राज्यातील तिसरे मोठे शहर आहे. ३१ मे १८६४ रोजी नागपूरमध्ये नगरपालिका अस्तित्वात आली. त्यावेळी सुमारे १६ हजार चौ. किमी क्षेत्रफळ असलेल्या नागपूर शहराची लोकसंख्या ८२ हजार होती. २ मार्च १९५१ रोजी या नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रुपांतर झाले, तेव्हा शहराची लोकसंख्या ४,८२,३०४ होती.

नागपूर महानगरपालिकेवर गेल्या १५ वर्षांपासून भाजपची सत्ता आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पालिकेच्या निवडणुका होतात. २०१७ च्या निवडणुकीत भाजपने १०६ नगरसेवक निवडून आणले, तर २०२६ मध्ये १०२ नगरसेवक विजयी झाले, ज्यामुळे सलग चौथ्यांदा सत्ता राखण्यात भाजपला यश मिळाले.

यावेळी नागपूर मनपाचे महापौरपद सर्वसाधारण गटासाठी असून कोणतेही आरक्षण नाही . भाजपाकडून शिवानी दाणी यांच्या डोक्यावर महापौरपदाचा मुकूट चढवण्यात येणार असल्याची चर्चा असली तरी, अनेक दावेदार आहेत.

नागपूर महानगरपालिकेचे पहिले महापौर होण्याचा मान शेषराव वानखेडे यांना मिळाला. त्यांनी २४



जुलै १९५२ रोजी प्रथम महापौर म्हणून कार्यभार स्वीकारला आणि १४ जानेवारी १९५३ पर्यंत ते या पदावर कार्यरत होते. त्यानंतर ९ जानेवारी १९५४ ते १२ मे १९५५ आणि १२ मे १९५५ ते २४ जानेवारी १९५६ याप्रमाणे त्यांनी सलग दोन वेळा महापौरपद भूषवले.

१९५१ साली नागपूर महापालिका अस्तित्वात आली, तेव्हा ४२ नगरसेवक होते. ७० वर्षांनंतर महापालिकेचे क्षेत्र वाढले आणि नगरसेवकांची संख्या १५६ पर्यंत पोहोचली. २०१७ च्या महानगरपालिका निवडणुकीवेळी चार वॉर्डांचा एक प्रभाग होता, परंतु महाविकास आघाडी सरकारने २०२२ मध्ये फेररचना करताना तीन वॉर्डांचा एक प्रभाग केला.

महापालिकेच्या निर्मितीवेळी एका नगरसेवकास दरमहा ७५ रुपये भत्ता मिळायचा, तर सभेचा भत्ता १० रुपये होता. आता महापालिकेच्या नगरसेवकास महिन्याला २० हजार रुपये मानधन मिळते. नागपूर महापालिकेत अनेक कुटुंबातील सदस्यांनी महापौरपद भूषवले आहे. शेषराव वानखेडे हे पहिले महापौर होते, तर त्यांची कन्या कुंदाताई विजयकर यांना पहिल्या महिला महापौर होण्याचा मान मिळाला. कुंदाताईनी ५ फेब्रुवारी १९९६ ते ९ फेब्रुवारी १९९९ पर्यंत महापौर म्हणून कार्यभार सांभाळला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांचे वडील गंगाधरराव फडणवीस हे दोघेही नागपूरचे महापौर राहिले आहेत. गंगाधरराव फडणवीस १४ फेब्रुवारी १९७५ ते ७ मार्च १९७६ या कालावधीत महापौर होते. देवेंद्र फडणवीस यांनी ५ मार्च १९९७ ते ६ फेब्रुवारी १९९८ आणि ७ फेब्रुवारी १९९८ ते ४ फेब्रुवारी १९९९ असे दोनदा महापौरपद भूषवले.

# चंद्रपूर महानगरपालिकेत सलग पाचव्यांदा होणार महिला महापौर

■ **महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २२ :**

चंद्रपूर महापालिका महापौर पद सलग पाचव्यांदा महिलासाठी राखीव निघाले आहे. यावेळी ओबीसी महिला प्रवर्गासाठी महापौरपद आरक्षित असल्याने काँग्रेस पक्षाकडे माजी महापौर संगीता अमृतकर, सुनंदा धोबे, चंदा वैरागडे या महिला नगरसेविकांची नावे आघाडीवर दिसत आहे. तर भाजपकडे संगीता खांडेकर , ॲड सरिता संदुरकर यांची नावे आहे.

शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडे मनस्वी गिरे यांचे नाव आहे. काँग्रेस, भाजप या पक्षाकडे बहुमत नसल्याने संख्याबळाचे गणित जुळवताना शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष राहणार आहे. चंद्रपूर महापालिका २०१२ मध्ये स्थापन झाली. पहिले महापौर पद ओबीसी महिला प्रवर्गासाठी राखीव निघाले होते. तेव्हा काँग्रेसच्या संगीता अमृतकर पहिल्या महापौर झाल्या होत्या. त्यानंतर महापौर पदाचे आरक्षण महिला खुल्या प्रवर्गासाठी राखीव होते.

२०१४ मध्ये तेव्हा काँग्रेसच्या नगरसेविका राखी कंचर्लावार यांनी काँग्रेस सोडून भाजपमध्ये प्रवेश केला आणि महापौर पदाची माळ त्यांच्या गळ्यात पडली. तिसऱ्यांदा महापौर पद पुन्हा ओबीसी महिला प्रवर्गासाठी राखीव निघाले होते. तेव्हा भाजपच्या अंजली घोटेकर यांची महापौर पदी वर्णी लागली. अडीच वर्षांनंतर पुन्हा महापौर पदाची सोडत निघाली तेव्हा महिला खुल्या प्रवर्गासाठी पुन्हा महापौर पद राखीव निघाले. यावेळी राखी कंचर्लावार दुसऱ्यांदा महापौर झाल्या.

आता आठ वर्षानंतर महापालिका निवडणुक झाली. यावेळी काँग्रेस, भाजप या दोन प्रमुख पक्षांपैकी एकही पक्षाला बहुमताचा आकडा गाठता आला नाही.

महापालिकेत काँग्रेस सर्वाधिक २७ नगरसेवकांसह सर्वात मोठा पक्ष आहे. त्या पाठोपाठ भाजप २३, शिवसेना ६, जनविकास सेना ३, वंचित बहुजन आघाडी २, अपक्ष २ आणि शिंदे सेना, बसप, एआयएमआयएम या पक्षाचा प्रत्येकी एक नगरसेवक आहे. संख्याबळाचे गणित बघता काँग्रेस व जनविकास सेना यांचे मिळून ३० नगरसेवक होतात. बहुमताच्या आकड्यासाठी काँग्रेसला ४ नगरसेवक हवे आहेत. तर भाजप व शिवसेना शिंदे मिळून २४ नगरसेवक होतात.

भाजपला बहुमतासाठी १० नगरसेवक हवे आहे. त्यामुळे काँग्रेस व भाजप या दोन्ही पक्षांनी शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे जिल्हा प्रमुख संदीप गिरे यांना चुचकारणे सुरू केले आहे.

# अकोल्यात महिला ओबीसी महापौर

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २२ :**

अकोला महानगरपालिकेत यावेळी महिला ओबीसी (इतर मागासवर्गीय) महापौर होणार हे निश्चित झाले असून, त्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.आरक्षणानुसार महापौरपद महिला ओबीसीसाठी राखीव झाल्याने विविध पक्षांत हालचालींना वेग आला आहे.

भाजपकडे एकूण १३ ओबीसी महिला नगरसेविका/नेत्या असून, यामुळे भाजपची दावेदारी मजबूत मानली जात आहे. महापौरपदासाठी वैशालीताई शेळके, पल्लवी मोरे, योगिता पावसाळे, मंजुषाताई शेळके, शिल्पाताई वरोकार, रश्मी अवचार, निकिता देशमुख, अंधारे ताई, शारदाताई खेडकर, नीतू जगताप, माधुरी क्षीरसागर, काकड ताई आणि ॲड. कल्पनाताई गोटे ही नावे चर्चेत आहेत.

या १३ दावेदारांपैकी कोणाच्या गळ्यात महापौरपदाची माळ पडणार, याकडे लक्ष लागले आहे. पक्षांतर्गत चर्चा, वरिष्ठ नेत्यांची भूमिका तसेच सामाजिक व राजकीय समीकरणांवर अंतिम निर्णय अवलंबून राहणार आहे.

अकोला महापालिकेचे सत्ता समीकरण जुळवण्यासाठी ८० पैकी ४१ नगरसेवकांच्या पाठिंब्याची गरज राहील. मतदारांनी कुठल्याही पक्षाला स्पष्ट बहुमत दिलेले नाही. त्यामुळे सत्ता स्थापनेची अडचण निर्माण झाली.

भाजप, राष्ट्रवादी अजित पवार गट आणि महानगर विकास समिती युतीच्या ८० पैकी ४० जागा निवडून आल्या आहेत. काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट, वंचित बहुजन आघाडी, एआयएमआयएम, राष्ट्रवादी शरद पवार गट, शिवसेना शिंदे गट व अपक्ष यांचे देखील एकूण ४० नगरसेवक जिंकले.

बहुमत सिद्ध करण्याचा भाजपला विश्वास आहे. सत्तास्थापनेसाठी भाजपला केवळ एका नगरसेवकाच्या पाठिंब्याची गरज राहील. शिंदे गटाच्या एका नगरसेवकासह स्पष्ट बहुमत असल्याचा दावा भाजपने केला. ठाकरे गटाचे सहा व शरद पवार गटाचे तीन नगरसेवक मिळून संख्याबळ ५० पर्यंत नेण्याची तयारी भाजपकडून सुरू झाली. भाजपला सत्तेच्या बाहेर ठेवण्यासाठी इतर पक्षांसोबत बोलणी करून समीकरण जुळवण्याची काँग्रेसची धडपड सुरू आहे.

# महापौरपदी कोण विराजमान होणार?

■ **महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. २२ :**

अमरावती महापालिकेच्या महापौरपदासाठी आज गुरूवारी आरक्षण सोडत काढण्यात आली. हे पद सर्वसाधारण प्रवगार्साठी राखीव ठेवण्यात आले आहे. त्यामुळे आता अमरावतीच्या १७ व्या महापौरपदासाठी मोठी स्पर्धा राहील. स्पष्ट झाले आहे.

महापालिकेच्या निवडणुकीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नसल्याने सत्ता स्थापन करण्यासाठी विविध पक्षांकडून मोर्चेबांधणी केली जात आहे. आता महापौर निवडीची प्रक्रिया लवकरच सुरू होईल. या आरक्षणामुळे कुणाला संधी मिळणार, याची उत्सुकता आहे.

१० मार्च १९९२ रोजी अमरावतीच्या प्रथम महापौरपदी डॉ. देवीसिंह शेखावत हे विराजमान झाले होते. १९९२ ते ८ मार्च २०२२ या ३० वर्षांच्या काळात अमरावती महापालिकेत १६ महापौरांनी धुरा सांभाळली आहे. ९ मार्च २०२२ पासून महापालिकेत प्रशासकीय राजवट आहे.

नुकत्याच झालेल्या निवडणुकीत भाजपने सर्वाधिक २५ जागांवर विजय मिळवला आहे. युवा स्वाभिमान पक्ष १५, काँग्रेस १५, एमआयएम १२, राष्ट्रवादी अजित पवार गट ११, शिवसेना शिंदे गट ३, बसप ३, शिवसेना ठाकरे गट २ आणि वंचित १ अशी सदस्यसंख्या आहे. ८७ सदस्यीय महापालिकेत महापौरपदाची निवडणूक जिंकण्यासाठी ४४ सदस्यांचे संख्याबळ आवश्यक राहणार आहे. कुठल्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नसले, तरी भाजप, युवा स्वाभिमान आणि मित्रपक्षांची सत्ता स्थापन होईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

अमरावतीच्या महापौरपदी विराजमान होण्याची संधी आजवर सोळा जणांना मिळाली आहे. त्यात पाच महिलांचा समावेश आहे. डॉ. देवीसिंह शेखावत हे प्रथम महापौर बनले, त्यानंतर प्रभाकर सव्वालाखे, गोविंद अग्रवाल, विद्याताई देशपांडे, किरणताई महल्ले, प्रवीण काशीकर, नितीन वानखडे, विलास इंगोले, दीपाली गवळी, मिलिंद चिमोटे, अशोक डोंगरे, ?ड किशोर शेळके, वंदना कंगाले, चरणजीत कौर नंदा, संजय नरवणे आणि चेतन गावंडे यांनी महापौरपद भुषविले आहे.

आता सतराव्या महापौरपदी कोण विराजमान होणार, याचे औत्सुक्य आहे. महापौरपदासाठी उमेदवार निवडणे हे राजकीय पक्षांसमोर आव्हान असणार आहे. महापालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी भाजपने पुढाकार घेतला आहे. युवा स्वाभिमान या मित्र पक्षाचे अध्यक्ष आमदार रवी राणा यांनीही युवा स्वाभिमान पक्षाच्या मदतीने भाजपचा महापौर होईल, असे जाहीर केले आहे. त्यामुळे भाजपमधील नगरसेवकांमध्ये हे मानाचे पद मिळवण्यासाठी स्पर्धा राहणार आहे. महापौरपदाच्या निवडीसाठी हालचालींना आता गती मिळणार आहे.

## लोकरंजन

# मन आतले मनातले 13 फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या भेटीला

आशयसंपन्न कथा असलेल्या मराठी चित्रपटांमध्ये आता आणखी एका चित्रपटाची भर पडणार आहे. उत्तम स्टारकास्ट असलेला मन आतले मनातले हा चित्रपट १३ फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर लॉंच करण्यात आले.

सूर्य फिल्म वर्ल्ड प्रस्तुत मन आतले मनातले या चित्रपटाची निर्मिती सुरेन महापात्रा यांनी केली आहे. सुरेन महापात्रा यांनी चित्रपटाचं कथा आणि पटकथा लेखन, तर संवादलेखन मनोज सुधाकर येऊनकर यांनी केले आहे. तर जेम्स अँथनी यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे.


अभिजित मजुमदार यांनी संगीत दिग्दर्शन, डॉ. सुनंदा डिवरे पळवणकर यांनी गीतलेखन केलं आहे. सुदर्शन सेनापती यांनी छायांकन, मलया आणि बिपिन यांनी संकलनाची जबाबदारी निभावली आहे. चित्रपटात अभिनेत्री मानसी नाईक अभिनेता सुरेन महापात्रा, अभिनेता उपेंद्र लिमये, ऋतुराज फडके, संदीप गायकवाड, कमलेशन सावंत, अरूण नलावडे, यतीन कार्येकर, सिया पाटील, राजेश आहेर, विनित भोंडे अशी तगडी स्टारकास्ट आहे. नावीन्यपूर्ण कथा, उत्तम स्टारकास्ट या चित्रपटात आहे. त्यामुळे हा चित्रपट प्रेक्षकांचं मनोरंजन करणारा आहे. ■ ■




# मराठी चित्रपटसृष्टीत हॉरर प्रेमकथेचा नवा अध्याय सहवास

मराठी चित्रपटसृष्टीत हॉरर आणि प्रेमकथेचा अनोखा संगम सादर करणारा नवा चित्रपट सहवास याचे पहिले पोस्टर नुकतेच प्रदर्शित करण्यात आले आहे.

सोनाई फिल्म क्रिएशन निर्मित या चित्रपटाने पोस्टरच्या माध्यमातूनच प्रेक्षकांच्या मनात कुतूहल आणि थरार निर्माण केला आहे. पोस्टरमध्ये एका पुरुषाच्या खांद्यावर ठेवलेला अदृश्य हात आणि गूढ, अंधुक वातावरण चित्रपटाच्या कथेतील रहस्य अधोरेखित करते.




प्रेम का भीती? हा सवाल उपस्थित करत, सहवास ही केवळ प्रेमकथा नसून, प्रेमाच्या नावाखाली उलगडणाऱ्या भयावह सहवासाची कथा असल्याचे संकेत पोस्टरमधून मिळतात. सहवास या चित्रपटाचे दिग्दर्शन शिवाजी दोलताडे हे करणार असून, निर्मितीची धुरा गोवर्धन दोलताडे हे सांभाळणार आहेत . सहनिर्माते म्हणून कार्तिक दोलताडे पाटील यांचे योगदान आहे. मराठी सिनेमात फारसा न पाहिलेल्या हॉरर-रोमँटिक शैलीत हा चित्रपट प्रेक्षकांसाठी वेगळा अनुभव ठरणार आहे.

■ ■ ■

# तस्करी मधल्या अमृता खानविलकरच्या दमदार ॲक्शन सीनची चर्चा!

पडद्यावर कायम काहीतरी नवीन भूमिका करून स्वतःच्या मयार्दा ओलांडून त्या पलिकडे जाऊन अमृता खानविलकर प्रेक्षकांना मोहित केलं आहे. सध्या अमृताच्या तस्करी वेब सीरिजच्या जोरदार चर्चा सुरू आहेत तिच्या ॲक्शन सीन पासून ते कस्टम ऑफिसर मिताली कामत म्हणून साकारलेली तिची भूमिका लक्षवेधी ठरताना दिसतेय. नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झालेल्या तिच्या पहिल्या वहिल्या ॲक्शन वेब सीरिज तस्करी च्या शूटिंगदरम्यानचा एक अविस्मरणीय अनुभव तिने नुकताच शेअर केला आहे.



तस्करी मध्ये अमृता अनेक ॲक्शन सीन केले असून तिची ही पहिली वेब सीरिज आहे ज्यात ती पहिल्यांदा दमदार ॲक्शन मोड मध्ये बघायला मिळतेय. शूट दरम्यानचा हा खास किस्सा अमृताने शेयर केला आहे. तस्करी मधल्या पहिल्याच ॲक्शन सीनदरम्यान तिला दुखापत झाली होती तरीही तिने शूटिंग सुरूच ठेवल त्या क्षणी नकळत तिने एका स्टंटमनच्या चेहऱ्यावर इतक्या जोरात मार दिला की तिच मनगट सुजलं आणि तब्बल महिनाभर तिच्या मनगटावर ही दुखापत राहिली. या एका सीन मुळे खरं तर सेटवर अनेक जण माझ्यासोबत ॲक्शन सीन करायला घाबरायला लागले.

■ ■ ■

# नॅशनल क्रश गिरीजा ओक झाली तू अनोळखी तरी सोबतीची फॅन

'सन मराठी'वर नवीन मालिका 'तू अनोळखी तरी सोबती' ही मालिका सुरु झाली आहे. मालिका प्रदर्शित होण्यापूर्वी मालिकेचे प्रोमो प्रचंड व्हायरल झाले होते. प्रत्येकाच्या मनाला भिडणारी ही कथा आहे.



सिनेसृष्टीतील बऱ्याच दिग्गज कलाकारांनी या मालिकेचं कौतुक केलं आहे. अशातच सध्या ज्या मराठी अभिनेत्रीची जगभरात चर्चा सुरु आहे ती अभिनेत्री नॅशनल क्रश अभिनेत्री गिरीजा ओकने सोशल मीडियावर व्हिडीओ पोस्ट केला आहे.

या व्हिडिओमध्ये गिरिजाने 'तू अनोळखी तरी सोबती' या मालिकेचं कौतुक करत तिच्या आयुष्यातील किस्सा शेअर केला आहे. तू अनोळखी तरी सोबतीचा पहिला भाग पाहताना गिरीजा ओकला तिच्या आणि नवऱ्याच्या प्रेमकथेच्या आठवणी जाग्या झाल्या असल्याचं तिने सांगितलं.

कामातून सुरू झालेली ओळख मैत्रीत आणि पुढे लग्नात बदलली. मालिकेतील समीर व अर्पिता यांची गोष्ट पुढे कशी जाणार हे पाहण्यासाठी गिरीजाही उत्सुक आहे. या मालिकेचं आणि गिरीजाचं एक खास कनेक्शन म्हणजे गिरिजाच्या सासऱ्यांनी लेखक, दिग्दर्शक श्रीरंग गोडबोले यांनी मालिकेचं शीर्षक गीत लिहलं आहे. सध्या सर्वत्र या शीर्षक गीताची चर्चा सुरु आहे. 'तू अनोळखी तरी सोबती' ही मालिका दररोज रात्री ९ वाजता 'सन मराठी'वर प्रसारित होते.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

